# श्री साईलीला

जून १९६३

★

किं. ५० न. पैसे



शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेची भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईंतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

तुम्हीं कोणीहि असा व कुठेंहि रहाणारे असा. भक्तिभावानें माझ्यापुढें हात पसरिला असतां मी तुमची मनकामना पूर्ण केल्याशिवाय रहाणार नाहीं. अंतःकरणांतील भक्तिभावाला भारी महत्त्व आहे. जेथें निस्सीम भक्ति आहे तेथें रात्र असो वा दिवस असो मी तुमच्या पुढ्यांत उभा आहे म्हणून समजा. त्यांत कसूर कधींहि होणार नाहीं. मात्र तुमच्या भक्तिभावांत कसूर होऊं देऊं नका. माझा देह शिरडींत आणि तुम्हीं रहाणारे सात समुद्रापलिकडे ! दोघांत केवढें मोठें हें अंतर ! असें मानूं नका. अंतरंगांत मी असलों म्हणजे सारें अंतर आपोआप क्षणार्धांत नाहींसे होतें. मी साईबाबापासून किती दूर अंतरावर आहें, मी काय वाटेल तें केलें तरी त्यांना काय समजणार आहे ? असें क्षणभरहि समजूं नका. तुम्हीं कुठेंहि असलां तरी तुमच्या वागण्याच्या साऱ्या खबरा मला समजत असतात हें विसरूं नका.

—श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४२ वें ] जून १९६३ [ अंक ३ रा

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ६३२६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४,

बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

आजकाल आमचें सारें करणें वरपांगी असतें. भक्ति करायची पूजाअर्चा करायची, देव देव करायचें, भजन पूजन करायचें, हें सारें कशासाठीं ? लोकांना दाखविण्यासाठीं ! अशा रीतीनें कदाचित सभोंवारच्या लोकांच्या डोळ्यांत तुम्हीं धूळ फेकूं शकाल परंतु ज्याची भक्ति करण्याचा तुम्हीं आव आणतां व ज्याच्यासाठीं एवढें अवडंबर माजवितां तो देव दूधखुळा नाहीं. लोकांना फसविलें म्हणून तुम्हीं त्याला फसवूं शकणार नाहीं.

तो तुमच्या ठायीं आहे तसाच सर्वांतर्यामी आहे. तो नाहीं कुठें ? त्याचें बीनतारी तारायंत्र अहोरात्र चालू असतें. त्याला खंड कधींही पडत नाहीं. तुम्हीं कितीही दूर अंतरावर, दूर देशीं, सातासमुद्रांपलीकडे असलां म्हणुन काय झालें ? तुमच्या मनांत कोणते विचार घोळतात, तुमची भक्ति दिखाऊ, वरपांगीं आहे की, अंतःकरणापासून केलेली आहे हें त्याला बरोबर समजतें. तुम्हीं दान धर्म करतां, दुसऱ्यावर उपकार करतां, त्यांत तुमचा हेतु काय असतो तो दुसऱ्यांना नाहीं कळणार; परंतु त्याला अचुकपणें कळत असतो.

‘जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती’ असें तुकोबानीं म्हटलें आहे तें उगाच नाहीं. ते त्यांच्या अनुभवाचे खडे व खरेखुरे बोल आहेत. तुमच्या अंतरंगांत त्याचें वास्तव्य असतां अज्ञानामुळें तुम्हांला मात्र त्याची जाणीव नसते. ‘तुम्हां हृदयींच माझें घर। अंतर्यामी तुमचे मी ॥’ असें बाबांनीं सांगितलें आहे. तेच भगवंताचे बोल आहेत. अर्जुनाला श्रीकृष्णानें तेंच सांगितलें ना !’

* * *

तुम्हां आम्हांला एक गोष्ट कधीं पटेल तो भाग्याचा दिवस म्हणावा लागेल. त्यादिवशीं सारे तंटे भांडणें, हेवेदावे मिटतील. भगवंताचें चिरंतन वास्तव्य आमच्या हृदयांत आहे; आणि तोच सर्व प्राणिमात्रांत वास करीत आहे. मनुष्य असो जनावर असो, कीडमुंगी असो ! तो मनुष्य याच देशींचा पाहिजे असें नाहीं. तो चीनचा असो, रशियाचा असो, कीं अमेरिकेचा असो. त्या प्रत्येकाच्या अंतःकरणांत माझें घर आहे. ही गोष्ट, ही सत्यकथा आम्हांला कधी बरें पटणार ! आणि ज्या दिवशीं ती पटेल त्या दिवशीं राग, द्वेष, मत्सर. चढाओढ सारें कांहीं मिटेल, लयाला जाईल. त्याची आम्हांला जाणीवच होत नाहीं. त्यामुळें आम्हीं काय करतों ? ईर्षेला पेटतों, एकमेकांच्या मानेवर सुरी ठेवायला सज्ज होतों. दारूगोळ्यांची कोठारे वाढवितों. व नाहक लक्षावधि लोकांचें बळी घेण्यास तयार होतों.

किती सोप्या भाषेंत बाबानी हें तत्त्वज्ञान तुम्हां–आम्हां सर्वांना सांगुन ठेवलें आहे !

‘ ऐसा तुम्हां हृदयस्थ जो मी । तयासी नमा नित्य तुम्हीं ।
भूतमात्राच्याहि अंतर्यामीं । तोच तो मी वर्ततों ॥
यास्तव तुम्हांस जो जो भेटे । घरीं दारीं अथवा वाटे ।
ते ते ठायीं मीच रहाटें । मीच तिष्ठें त्यामाजीं ॥
कीड मुंगी जलचर खेचर । प्राणिमात्र श्वान शूकर ।
अवघ्या ठायीं मीच निरंतर । भरलों साचार सर्वत्र ॥
मजशीं धरूं नका अंतर । तुम्हीं आम्हीं निरंतर ।
ऐसें मज जो जाणील नर । भाग्य थोर तयाचें ॥ ’

किती बहुमोलाचे, हिऱ्यामाणकांपेक्षां मोलाचे हे बाबांचे बोल आहेत नाहीं कां ? जगांतील गूढ, गहन अशा ईश्वरविषयक साऱ्या तत्वज्ञानाचें सार—अमृत त्यांत सामावलें आहे. काय अवघड आहे समजायला त्यांत ? किती सोप्या भाषेंत व तुमच्या अंतरांत प्रवेश करून बाबांनीं ‘ मजशीं धरूं नका अंतर ’ म्हणून कळवळ्यानें सांगितलें आहे ? परंतु आम्हीं इतकें असूनही परस्परांमध्यें, देशादेशांमध्यें अवघड अंतराच्या भिंती उभ्या करून ठेविल्या आहेत. सीमा प्रदेशांसाठीं झगडत आहोंत. व त्यासाठीं मानवी रक्ताचे पाट खुशाल वहावीत आहोंत. !

* * *

मानवाची अधोगति यापेक्षां आणखी दुसरी कोणती असावयाची ? एकानें दुसऱ्याचा पाणउतारा करण्यासाठीं तरवार उपसावयाची, हमरीतुमरीवर यावयाचें हें कशासाठीं ? मी मोठा, मी सर्वज्ञ आहें अशी जगाच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठीं ! तूं आज चढेलपणा करीत आहेस; परंतु त्या तुझी उद्यां गत काय होईल याचा विचार तुझ्या मनाला कधीं शिवला आहे कां ? या जगांत आजवर कोण टिकून राहिला आहे ? शाश्वति कोणालाही नाहीं. ज्यानें मी कोण हें ओळखलें, ज्यानें अहंकार टाकला, ज्यानें सर्वांतर्यामी प्रभू पाहिला, ओळखला व जो त्याच्याशीं माणुसकीनें वागला तोच या जगांत चिरंजीव झाला ! बाकी सारे आले तसें गेले ! त्यांच्यामागें त्यांचें नाव निशाणी कांहीं राहिली नाहीं.

बाबा सांगतात कीं—‘ **दिसाया ही वार्ता तोकडी । परी गुणानें बहु चोखडी** ॥ ’ हेंच आपण ओळखायचें आहे. एका कवीनें म्हटलें आहे कीं, ‘ साध्याहि विषयांत आशय कधीं मोठा बहु आढळे ’ तसेंच आहे हें !

आतांपर्यंत ज्याचें थोडक्यांत विवरण केलें त्या गोष्टी दिसायला अगदीं साध्यासुध्या आहेत. परंतु त्यांत जीवनव्यापी, तुमचें जीवन सुसमृद्ध करणारें, तुमचें जीवन फुलविणारें व सुगंधी करणारें असें तत्वज्ञान सांठविलेलें आहे. ‘ काय आहे त्यांत ? ’ असें म्हणून त्याच्याकडे पाठ फिरवूं नका. त्याचा विचार करा. तो तुमच्या दैनंदिन चिंतनाचा, निदिध्यासाचा विषय बनूं द्या.

आणि मग पहा तुमच्या जीवनाला कसा उजाळा येईल तें ! —**संपादक**

# प्रार्थना हेंच सामर्थ्य

**प्रार्थनेचें सामर्थ्य अमोघ आहे. आम्हां भारतवासीयांस हें सांगण्याची जरुरी नाहीं; परंतु जरुरी नसली तरी आजकाल ती गोष्ट अडगळींत पडली आहे. प्रार्थनेचें महत्त्व किती आहे यासंबंधींचे पुढील अत्यंत महत्त्वाचें विवेचन एका नामवंत अनुभवी अमेरिकन डॉक्टरनें केलें आहे.**

प्रार्थना म्हणजे सामर्थ्य. प्रार्थना म्हणजे केवळ देवाची भक्ति नव्हे तर माणसाला उत्साह व सामर्थ्य देणारी ती एक अदृश्य शक्ति आहे. रोज अंतःकरणापासून प्रार्थना करण्याची तुम्ही जर का संवय लावून घेतली तर तुमच्या जीवनांत जरूर तो क्रांतिकारक थारेपालट घडून आलेला तुम्हांला आढळून येईल. जीवन समृद्ध करणारी ती एक शक्ति आहे.

तुमच्याठायीं जबरदस्त आकर्षण निर्माण करणारें तें एक खात्रीचें साधन आहे. मोठमोठ्या डॉक्टरांनीं जेथें हात टेकले अशा दुर्धर रोग्यांना रोगमुक्त करण्याचें सामर्थ्य प्रार्थनेंत आहे. असे अनेक दाखले आजवर उपलब्ध झालेले आहेत. एतद्देशीय डॉक्टरांचेंच केवळ हें मत नसून अमेरिकन व इंग्रज तज्ज्ञ डॉक्टरांच्याहि नजरेला प्रार्थनेचें हे अमोघ सामर्थ्य देऊन चुकलें आहे.

## जीवन उज्वल करणारें साधन

आपल्या रोजच्या जीवनांत प्रार्थनेच्याद्वारें आपण कामाकाजासाठीं जरूर असलेला उत्साह मिळवूं शकतो. त्या उत्साहाच्या व शक्तीच्या बळांवर किती तरी महत्वाचीं कामें आपणास सुखानें पार पाडतां येतात. प्रार्थना म्हणजे सामर्थ्याचें पॉवर हाऊस आहे. प्रार्थनेच्या बळावर किती तरी लोकांनीं आपलें जीवन दैदिप्यमान बनविलें आहे. जीवन उजाळून सोडणारें तें एक अमोघ साधन आहे.

पुष्कळ लोकांना वाटत असतें कीं, कांहीं ठराविक शब्दांचा उच्चार करणें म्हणजे प्रार्थना. देवाकडे कांहीं तरी याचना करण्याचें एक साधन. यापलिकडे काय आहे त्यांत अर्थ! असें कित्येक लोकांना वाटत असतें. परंतु तसें नाहीं बरें! प्रार्थना ही इतकी

सर्वंग व सर्वसाधारण वस्तु नाहीं. तिचें सामर्थ्य अनन्यसाधारण आहे. मानवाला देव बनविण्याची, मानवाला कर्तबगार बनविण्याची किमया प्रार्थना करूं शकते.

मनुष्याचें व्यक्तिमत्व घडविण्याचें, मनुष्याकडून वाटेल तें कृत्य घडवून आणण्याचें सामर्थ्य प्रार्थनेंत आहे. तें सामर्थ्य आपण समजून मात्र घेतलें पाहिजे. प्रार्थना काय करायची आहे ! अशी तिची हेटाळणी करूं नका. प्रार्थना सर्वशक्तिमान प्रति परमेश्वर आहे.

## ही सत्यकथा आहे

कोणालाही डगमगणार नाहीं कोणत्याही बिकट परिस्थितींत हादरून जाणार नाहीं, अशी प्रचंड शक्ति प्रार्थनेंत आहे. मनुष्याचा देह किती नाजूक व क्षुल्लक आहे ! परंतु तो चैतन्यमय व उत्साह संपन्न बनविण्याचें सामर्थ्य एका प्रार्थनेंत आहे. मन शरीर व आत्मा यांचा समन्वय घडवून आणणारी ती प्रार्थना.

प्रार्थनेपाशीं एवढें अचाट सामर्थ्य आपणांस कसें बरें प्राप्त होतें ? याचें कारण काय ? याचें उत्तर आजचीं भौतिक शास्त्रें देऊं शकत नाहींत. भौतिक शास्त्रांच्या कक्षेंत येणारा हा प्रश्न नव्हे. मनुष्याची शक्ति ही नियमीत व आटोपशीर आहे. परंतु या जगाचें नियंत्रण करणारी अशी एक अचाट परंतु प्रचंड व अनन्यसाधारण शक्ति आहे. त्या शक्तीला मनोभावें जो कोणी एकाग्र प्रार्थनेच्याद्वारें शरण जातो त्याच्या वांट्याला व सहाय्याला ती अनन्य साधारण शक्ति आल्याशिवाय रहात नाहीं. ही सत्य कथा आहे. अनुभवानें खरी ठरलेली ही गोष्ट आहे.

जेव्हां आम्हीं अंतःकरणापासून प्रार्थना करतों, देवाला हांक मारतों तेव्हां ती दैवी शक्ति आपल्या हांकेला ओ दिल्याशिवाय रहात नाहीं. कितीही उच्चासनावर ती असली तरी तिला खालीं उतरावेंच लागतें. त्यामुळें आमच्या ठायीं जी कांहीं निर्बलता, निरुत्साह व नैराश्य असेल त्याचा नायनाट होतो व त्यांची जागा उत्साहानें व सामर्थ्यानें व्यापिली जाते. असें आहे हें तंत्र. हें कोडें तुम्हांला आधुनिक शास्त्रांच्या सहाय्यानें सोडवितां येण्यासारखें नाहीं.

## प्रार्थना कुठेंही करतां येते

तुम्हांला तुमचें व्यक्तिमत्त्व सुधारावयाचें आहे ना ? त्याला सुयोग्य वळण लावावयाचें आहे ना ? मानव स्वरुपाला देवस्वरूप प्राप्त व्हावें असें तुम्हांला वाटतें ना ? मग तुम्हीं स्वतःला प्रार्थनेची संवय लावून घेतली पाहिजे. जसें जेवणें खाणें त्याप्रमाणें प्रार्थनाही जीवनांतील एक अत्यावश्यक गोष्ट होऊन राहिली पाहिजे.

प्रार्थना काय कुठेंही करतां येते. तिला अमुक प्रकारची जागा पाहिजे. किंवा अमुकच वेळ पाहिजे. असें मुळींच नाहीं. रस्त्यानें जात असतां, शाळा कॉलेजांत शिकत असतां, कचेरीत कामकाज करीत असतां, देवळांत किंवा आपल्या घरांतील एखाद्या निवांत

खोलींत क्षणभर बसून तुम्हीं प्रार्थना करूं शकतां. तुम्हांला प्रार्थनेशीं एकतानता मात्र साधतां आली पाहिजे. त्यांत आपलें अंतःकरण सर्वस्व ओततां आलें पाहिजे. प्रार्थनेसाठीं अमूकरीतीनें बैठक मारली पाहिजे, अमूक वेळ व अमूक जागा पकडली पाहिजे, असें मुळींच नाहीं.

**प्रार्थनामय जीवन**

परंतु एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवणें अत्यंत जरूर आहे. सकाळच्या प्रहरीं कुठें तरी बसून प्रार्थना करायची आणि बाकी दिवसभर सैतानाप्रमाणें सैराट वागायचें! अशा प्रार्थनेचा काय बरें उपयोग होणार? प्रार्थनामय जीवन हें पवित्र आचरणानें शोभवायचें असतें. दुष्ट, सैतानीं कृत्यांनीं त्या जीवनाला काळोखी आणावयाची नसते. प्रार्थना म्हणजे प्रकाश. काळोख नव्हे. तेथें काळ्या कृत्यांना बिलकूल स्थान मिळतां कामां नये.

खरीखुरी व अंतःकरणापासून करण्यांत आलेली प्रार्थना हा यशस्वी जीवनाचा एक भाग आहे. तें जीवनच वेगळें व आगळें असतें. जीवन सुंदर बनवायचें म्हणजे प्रार्थनेचा सहकार घेतल्याशिवाय तें साध्य होणार नाहीं.

आज जग विनाशाकडे धांव घेत जात आहे. कुठें खड्डयांत जाऊन पडणार आहे समजत नाहीं. कारण काय .याचें? याचें प्रमुख कारण आम्ही धर्माला व प्रार्थनामय जीवनाला पारखे झालेलें आहोंत हेंच होय. धर्मभावनेशीं आमची फारखत झालेली आहे. त्यामुळें सत्याशीं, जीवनांतील उच्चतम बहुमोल मूल्याशींहि आमची फारखत झाली आहे! आम्हीं दुःखाच्या, विनाशाच्या खाईंत लोटले जात आहोंत! ज्या ठिकाणाहून आम्हांला दुर्दम्य उत्साह व अलोट शक्ति मिळावयाची, त्या ठिकाणाकडे आम्हीं पाठ फिरविली आहे. आमचा विकासच थांबला आहे. प्रार्थना नाहीं, देवाची आठवण नाहीं मग विकास कसा संभवेल? मनाच्या, आत्म्याच्या उन्नतीचें साधनसर्वस्व म्हणजे प्रार्थना. तिच्याशीं फारकत झाल्यावर उन्नतीचा मार्ग सुटणार नाहीं तर दुसरें काय होणार? तेव्हां प्रत्येक व्यक्तीनें व सामुदायीकरित्या प्रत्येक राष्ट्रानें उन्नतीसाठीं विकासासाठीं व प्रगतीसाठीं प्रथम प्रार्थनेची कांस धरली पाहिजे.

आजहि सर्वसाधारण स्त्री-पुरुषांच्या जीवनांत जर प्रार्थनेचा प्रवेश होईल तर आज जग आहे त्यापेक्षां किती तरी पटीनें सुधारण्याची आशा आहे.

---

# देव जात गोत पहात नाहीं

लेखक : एक जिज्ञासू

**देव भावाचा भुकेला. भक्ति करणारा मग तो ब्राह्मण असो या महार, चांभार असो. देवाच्याठायीं तो भेदभाव नाहीं. संत रोहिदास हा जातीचा चांभार. परंतु भगवद्भक्तीमुळें त्याची योग्यता ब्राह्मणापेक्षाही श्रेष्ठता पावली होती. ब्राह्मणाला त्याच्यापासून ब्रह्मज्ञानाचे धडे कसे शिकावे लागले ते पुढील संतचरित्रांत पहा !**

एका विरट पुरुषाच्या शरीरापासूनच सर्व द्दश्यभूत उत्पन्न झालें असल्याकारणानें मनुष्यमात्रांत जातिभेद मानण्याचें कारण नाहीं. व परमात्म्याच्या ठिकाणीं विषमभाव किंवा जातिभेदानुसार प्रतारणा असणें संभवनीय नाहीं. या गोष्टी खऱ्या असल्या तरीही एवढ्याच मुद्यावर विसंबून जातिभेद नष्ट करून सबगोलंकार करण्याची हाव धरणें म्हणजे अध्यात्म, कर्मयोग, कर्मसंन्यास आणि सांख्यशास्त्र याबद्दलचें अज्ञान प्रगट करून दाखविणें होय. परमेश्वराच्या समावस्थेच्या तत्त्वावर जाति नष्ट करण्यास प्रवृत्त होण्यापूर्वी ज्यानें त्यानें आपापला अधिकार लक्षांत आणला पाहिजे. श्रीशंकर गांजापाणी पिऊन सदा धुंदींत असतात या सबबीवर व्यसनपरायण होणाऱ्यांनीं श्रीशंकरांनीं हलाहल प्राशन केलें, मस्तकावर चंद्र धारण केला, गळ्यामध्यें महान विखार परिधान केलें वगैरे गोष्टीही ध्यानांत धरिल्या पाहिजेत. पांचशें रुपयांचा इनामदार गाडीघोडा बाळगतो असा आधार घेऊन इनामदाराच्या जातींतील पांच रुपये सहा आण्याचे इनामदारही घोडे उडविण्याचा शोक आरंभितील तर थोडक्यांतच कर्जबाजारी होऊन देशोधडी लागण्याचा प्रसंग ओढवेल. तात्पर्य, आपली आपण किंमत जाणणें हा मुख्य मुद्दा आहे. ज्याचें विषयप्रेम सुटलें असून ज्यानें आपल्या अंगास पिंडब्रह्मांडाची विभूती चोळली असेल व ज्याला सर्व जगत् ईश्वरमय दिसत असेल त्याला जातिभेदासारख्या गोष्टींचें मुळींच बंधन नाहीं. पण जोंपर्यंत तशी स्थिति प्राप्त झाली नाहीं, शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, यांच्या तडाक्यांतून ज्याचा एक क्षणही मोकळा जात नाहीं अशा लोकांनीं स्वधर्म व विहिताचार यांना मिठी मारून राहिल्यावांचून गत्यंतरच नाहीं. तुलना ही नेहमीं दोन सारख्या वस्तूंत होत असते, त्याअर्थी कर्म करण्यापूर्वी आपणा स्वतःस लागू करून घ्यावयाच्या उदाहरणाचा व आपला अधिकार तपासणें हाच खरा शहाणपणा आहे. रोहिदास

चांभाराच्या चरित्राचा आधार घेऊन कांहीं तामसीवृत्तीच्या लोकाकडून जनतेचा गैरसमज होण्याचा संभव आहे. एतदर्थ सर्व सज्जनांनीं रोहिदासाचें चरित्र अवश्य वाचून त्याचें मनन करावें अशी आमची त्यांना हात जोडून प्रार्थना आहे.

## हरिभजन हाच व्यवसाय

रोहिदास हा जातीचा चांभार होता; पण त्यानें आपला देह हरिचरणावर वाहिलेला होता. त्याच्या वाचेला रात्रंदिवस हरिभजनावांचून दुसरा कांहींच व्यवसाय नव्हता. सर्व दुराशेचा त्याग करून तो मोठ्या भावानें हरिगुणकीर्तन करीत असे. स्नान करून विष्णुपूजा करणें हा त्याचा नित्यनेम असे. आपण पूर्वसंचितानुसार संसारयात्रेंत अडकलों तरी परोपकाराच्या साहाय्यानें आपली बंधमुक्तता होईल अशी त्याची भावना होती. त्या भावनेनुसार तो आपल्या शक्तीप्रमाणें येईल त्या वैष्णवाला एक जोडा दान करीत असे. रोहिदासाच्या कृतींत कांहीं एक दोष नव्हता. जात कोणत्याही प्रकारची नीच असली तरी परोपकारानें देहाचें सार्थक घडून येण्यास कांहीं एक अडचण पडणार नाहीं असा शास्त्रनियम आहे. सोनार, कुंभार, तेली, माळी, कोळी, मांग, महार, धेड काय आणि ब्राह्मण काय कोणीही आपापल्या धर्मास जागून परोपकाराची कांस धरिली असतां सर्वांवर परमेश्वराची कृपा होईल हा निश्चित सिद्धांत आहे. भाळ्याभोळ्यांच्या कानांत उपदेशाची अक्षरें फुंकून त्यांना सेवकभावाच्या वृत्तीनें बांधून टाकून आपलीं कामें भागविणाऱ्या व पढतमूर्ख अशा गुरूंच्या पूजेपेक्षां परोपकाराची पुजा करून विष्णुभक्तांना शरण जाण्यानेंच परमेश्वराचा कृपाप्रसाद होईल, अशा निश्चयानें रोहिदास विष्णुस्वरूपी संतांची सेवा करूं लागला.

रोहिदास प्रातःस्नान करून विष्णुपुजा करण्यापूर्वी भोजन करून नंतर हरिपूजा करी. वस्तुतः हा पूजेचा प्रकार विपरीत होय. पण कलियुगामध्यें प्राण अन्नमय असल्यानें ध्यान धरून बसले असतां क्षुधेच्या योगानें ध्यान फांकून जाईल अशा भावनेनें तो आधीं प्राणाला आहुती अर्पण करीत असे. वाट चालत असतां वाटमाऱ्यांचा घाला आला असें पाहतांच प्रवाशी पहिल्यानें आपल्या जवळचें धन टाकून देतो, भूमिगत द्रव्य काढण्याच्या वेळीं द्रव्यप्राप्ति होण्याच्या आधींच साधक लोक त्या धनावर बसणाऱ्या महासर्पाला देणें देऊन टाकतात, त्याचप्रमाणें रोहिदास हरिध्यानांत विघ्न आणूं पाहणाऱ्या जठरानलाला आधींच नैवेद्य देऊन मग स्वस्थ चित्तानें ध्यान करीत असे.

## पूजेची उपकरणें कातड्याची

रोहिदासाच्या घरची पूजेची सर्व उपकरणीं कातड्याची होतीं. चर्माचा बादला पाण्यानें भरून घेऊन आणि कातड्याची संबळी, संपुष्ट, गवाळें, आसन वगैरे सर्व वस्तु घेऊन एके समयीं रोहिदास देवपुजेला बसला होता. अशा

समयीं त्या ठिकाणीं एक ब्राह्मण पंचांग सांगण्याकरितां आला. त्या ब्राह्मणानें तुळशीवृंदावनाच्या स्वच्छ ओट्यावर आपली बैठक मारिली. ब्राह्मणास पाहतांच त्या अभेद चांभारानें त्याला नमस्कार घातला. आपल्या शुद्ध भावनेप्रमाणें रोहिदासानें जें करावयाचें तें यथायोग्य केलें; पण त्याच्या कृतींत त्या ब्राह्मणाला मोठा दोष दिसून आला. रोहिदासाला दूषण लावण्याच्या बुद्धीनें तो ब्राह्मण बोलला, 'रोहिदासा, तुला कांहीं ज्ञान नाहीं. कातड्याच्या आसनावर बसून केलेली विष्णुपूजा देवाला कितपत रुचेल ? ज्या शालिग्रामाची पुजा करणें हा आम्हां ब्राह्मणांचा अधिकार आहे, त्याला तूं कातड्याच्या संबळींत टेवतोस हें केवढें निंद्यकर्म आहे ? जो भगवान् व्रतें, तप, यज्ञ करूनहि सांपडत नाहीं, शास्त्राला ज्याचा अंत नाहीं, जो क्षीरसागरामध्यें शेषावर शयन करितो त्याला तूं घाणेरड्या, अपवित्र कातड्यांत गुंडाळून टाकतोस हें महत्पाप होय.'

## रोहिदासाचें उत्तर

त्या ब्राह्मणाचे हे पोकळ आढ्यतेचे शब्द ऐकून हरिरूपी रंगलेला रोहिदास बोलला 'सर्व सजीव जग कातड्यानेंच वेष्टिलेलें आहे. इतकेंच नव्हे तर ज्याच्यावर तुम्हीं हरिकीर्तन व दुपारती करितां तो मृदंग, ढोल चर्मानेंच मढविलेला असतो. देवाला स्नान घालावयाच्या पंचामृतांत ज्या दुधाचा उपयोग करितात तें दूध चर्मवेष्टित धेनूपासूनच निर्माण झालेलें असतें. जारज, अंडज, इत्यादि खाणींतील जीवांचीं शरीरें चर्मानेंच आच्छादलेलीं असून त्या चर्माच्छादित सांगाड्यांतच परमात्मा वास्तव्य करितो. चारी वर्ण कातड्यानेंच झांकलेले आहेत. कातड्याचा नगारा कातड्याच्या हातांनींच वाजवावा लागतो. तशा आघातानें उत्पन्न झालेला ध्वनी ऐकणारे कान कातड्याचेच असतात. ज्या स्थानांतून वेदगर्जना होते तें ब्राम्हणाचें मुखहि चर्माचेंच असतें. तुम्हीं स्वतःस ब्राह्मण म्हणवून पोकळ अभिमानाच्या वल्गना करणारे ब्रह्मदेव चर्माच्या हस्तानेंच चर्माच्या तोंडांत अन्नग्रास घालतां. तुमच्या चर्मवेष्टित हृदयसंपुटांत अक्षय्य वास करणाऱ्या आत्मारामाला या रोहिदासानें चांभाराच्या धर्मास अनुसरून कातड्यास संबळींत शुद्ध भावानें ठेविला यांत तुमच्या दृष्टीला दोष कां दिसावा बरें ?

## वाणी पटली पण कृति पटली नाहीं

रोहिदासाची ज्ञानमय वाणी ऐकून त्या ब्राह्मणास त्याचा अधिकार तर कळला नाहींच, पण उलट तो आपलेंच मत खरें करण्याच्या बुद्धीनें पुन्हां म्हणाला, "तूं सर्व ब्रह्मज्ञान सांगतोस, अनेक तऱ्हेचें दाखले देतोस; पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. कातड्याच्या शरीरांत जीव असल्या कारणानें त्यांचीं उदाहरणें या निर्जीव कातड्यास लागूं पडत नाहींत. हीं कातडीं त्याज्यच समजावयाचीं. तसल्या घाणेरड्या व अमंगळ पदार्थांचा विटाळच मानणें इष्ट आहे."

ब्राह्मणाचें विटाळाचें पांडित्य ऐकून रोहिदासानें सांगितलें " जीवासहित असलेल्या कातड्याच्या शरीराला जर विटाळ नाहीं तर शिवासहित असलेल्या गवळ्याचा जगव्यापी परमात्म्यास विटाळ कां व्हावा ? ऋतुस्नात स्त्रीचें शोणित आणि पुरुषाचें शुक्र यांपासून ज्याची उत्पत्ति तें शरीर किती तरी अमंगळ आहे बरें ? तसल्या शरीराच्या जन्ममरणाचा तुम्हीं विटाळही मानतां ! त्या शरीराच्या ठिकाणीं एकही वस्तु मंगल नाहीं. सर्व कांहीं अमंगळच भरलें आहे. अशा घाणेरड्या शरीरांत वास्तव्य करण्यानें जर आत्माराम विटाळत नाहीं तर कोणत्या तरी एका शरीराच्या कातडीनें निष्कलंक व सर्वव्यापी परमात्मा विटाळणें संभवनीयच नाहीं.'

आपले सर्व मुद्दे लटपटून जात आहेत असें पाहून त्या ब्राह्मणानें रोहिदासाच्या ठिकाणीं शुद्ध शालग्रामाच्या पूजेचा दोष स्थापिला. चांभाराला शालग्राम पूजनाचा अधिकार नाहीं असें ऐकून घेऊन रोहिदासानें त्या ब्राह्मणास पूजाधिकाराविषयीं नम्रतेनें प्रश्न विचारला. रोहिदासाच्या लीनतेचा भलताच अर्थ करून तो ब्राह्मण अधिकारयुक्त वाणीनें म्हणाला ' मूर्खा ! तूं अगदीं अडाणी आहेस. चारीवर्णांत आम्ही ब्राह्मण श्रेष्ठ; सर्व देवांत श्रीहरि श्रेष्ठ. श्रेष्ठांची पूजा श्रेष्ठांनींच करणें उचित होय. विष्णूची पूजा करण्याची योग्यता येण्यास ब्राह्मणाचा जन्म जरूर आहे. आम्हीं ब्राह्मण यज्ञोपवीताचें अधिकारी असल्यानें भगवान् विष्णूची पूजा करावयास आम्हीं ब्राह्मणच अधिकारी आहों. '

त्या ब्राह्मणाची ही यज्ञोपवीताची गर्वोक्ति ऐकून रोहिदास बोलला ' आपलें म्हणणें इतकेंच असेल तर मीहि येथल्या येथें तुम्हांला आपलें यज्ञोपवीत दाखवितों पहा. '

## पोट फाडून यज्ञोपवीत दाखविलें

असें म्हणून सर्व जगत् विष्णुमय मानणाऱ्या त्या रोहिदासानें हातामध्यें रापी धारण केली आणि तिच्या योगानें आपलें पोट फाडून त्यामध्यें त्या ब्राह्मणास यज्ञोपवीत दाखविलें.

हा प्रकार पाहतांच तो ब्राह्मण पश्चात्ताप पावला. त्याला रोहिदास चांभाराचा खरा अधिकार समजून आला. रोहिदास हा जातीनें चांभार असून अभेद भक्त आहे असा प्रत्यय येतांच तो ब्राह्मण पुढें काय बोलणार ? त्याची वृत्ति स्तंभ झाली. सहाणेवरच्या घासण्यानें जसें हिऱ्याचें तेज अधिकच लकाकतें, त्याप्रमाणें त्या निंदक, अज्ञानी, गर्विष्ठ, वाचाळ व पोकळ डौली ब्राह्मणाच्या छळानें उलट रोहिदासाचाच महिमा चारी दिशा व्यापून राहिला.

---

# ‘संतांना शरण जा’

—संत विनोबा

स्वधर्म टाळून अवांतर धर्म स्वीकाराल तर निष्कामतेचें फळ अशक्यच आहे. स्वदेशी माल विकणें हा व्यापाऱ्याचा स्वधर्म आहे. परंतु हा स्वधर्म सोडून जेव्हां तो सात हजार मैलांवरचा विदेशी माल विकूं लागतो, तेव्हां अधिक नफा मिळेल हाच हेतु मुळीं त्यांच्या डोळ्यांसमोर असतो. मग त्या कर्मांत निष्कामता कोठून येणार? म्हणूनच कर्म निष्काम होण्यासाठीं स्वधर्म आचरण्याची अत्यंत जरूर असते. परंतु हें स्वधर्माचरणहि सकाम असूं शकतें. अहिंसेचीच गोष्ट आपण घेऊं या. जो अहिंसेचा उपासक आहे त्याला हिंसा तर वर्ज्य आहे; परंतु बाहेरून अहिंसक असूनहि तो हिंसामय असूं शकेल. कारण हिंसा हा मनाचा धर्म आहे. बाहेरचें हिंसाकर्म न केल्यानेंच मन अहिंसामय होईल असें नाहीं. तलवार धरल्यानें हिंसावृत्ति दिसूनच येतें. परंतु तलवार सोडल्यानें मनुष्य अहिंसामय होतोच असें नाहीं. स्वधर्माचरणाचें हुबेहूब असेंच आहे. निष्कामतेसाठीं परधर्म तर टाळलेच पाहिजेत. परंतु हा केवळ निष्कामतेचा आरंभ झाला. तेवढ्यानें साध्य गांठलें असें नाहीं.

निष्कामता हा मनाचा धर्म आहे. हा मनाचा धर्म उत्पन्न होण्यास स्वधर्माचरण एवढें एकच साधन पुरेसें नाहीं. दुसऱ्या साधनांचाहि अवलंब करावा लागेल. केवळ तेलवातीनें दिवा लागत नाहीं, तेथें ज्योतीची गरज असते. ज्योत असेल तरच अंधार दूर होईल. ही ज्योत कशी पेटवायची? त्यासाठीं मानसिक संशोधन हवें. आत्मपरीक्षण करून चित्तावरील खममळ धुऊन टाकले पाहिजेत. तिसऱ्या अध्यायाच्या शेवटीं हीच महत्त्वाची सूचना भगवंतांनीं दिली होती. त्या सूचनेंतूनच चौथ्या अध्यायाचा जन्म आहे.

## दगडासमोर दगड!

गीतेंत “कर्म” हा शब्द “स्वधर्म” या अर्थानें वापरलेला आहे. आपण खातों, पितों, झोंपतों, हीं कर्मेंच आहेत. परंतु या क्रिया गीतेंतील “कर्म” शब्दानें सुचविल्या नाहींत. कर्म शब्दानें स्वधर्माचरण घ्यावयाचें. परंतु हें स्वधर्माचरणरूपी कर्म करून निष्कामता पदरांत पाडून घेण्यासाठीं आणखी एक महत्त्वाची मदत पाहिजे. ती म्हणजे कामक्रोध जिंकणें ही होय. चित्त गंगाजलाप्रमाणें निर्मळ व प्रशांत झाल्याशिवाय निष्कामता नाहीं. अशा प्रकारें चित्तसंशोधनासाठीं जीं कर्में करावयाचीं, त्यांना गीता विकर्म अशी संज्ञा देते. कर्म, विकर्म व अकर्म हे तीन शब्द चौथ्या

अध्यायांत महत्त्वाचे आहेत. कर्म म्हणजे बाहेरची स्वधर्माचरणाची स्थूल क्रिया. या बाहेरच्या कर्मांत चित्त ओतणें म्हणजेच विकर्म. बाहेरून आपण नमस्कार करतों, परंतु ह्या बाहेरच्या शिर नमविण्याच्या क्रियेबरोबरच आंतून जर मन नमलें नसेल तर बाह्य क्रिया व्यर्थ होय. अंतर्बाह्य एक झालें पाहिजे. बाहेरून मी शंकराच्या पिंडीवर संतत धार धरून अभिषेक करतों. परंतु ह्या जलधारेबरोबर मानसिक चिंतनाची धार जर अखंड ओतली जात नसेल तर त्या अभिषेकाला काय किंमत? मग ती समोरची पिंडी म्हणजे दगड आणि मीहि दगडच. दगडासमोर दगड बसला एवढाच अर्थ होईल. बाह्य कर्माशीं आंतून चित्तशुद्धीचें कर्म जोडलें गेलें तर निष्काम कर्मयोग लाभतो.

'निष्काम कर्म' या शब्दप्रयोगांत कर्म या पदापेक्षां निष्काम या पदालाच अधिक महत्व आहे. ज्याप्रमाणें "अहिंसात्मक असहकार" या शब्दप्रयोगांत असहकार या शब्दांपेक्षां अहिंसात्मक या विशेषणालाच अधिक महत्त्व आहे, अहिंसा दूर करून जर असहकार पुकारला तर ती एक भयानक वस्तु होऊं शकेल, त्याप्रमाणेंच स्वधर्माचरणाचें हि कर्म करीत असतां मनाचें विकर्म जर तेथें नसेल तर तो धोका आहे.

## कर्म आणि विकर्म

आज सार्वजनिक सेवा करणारे स्वधर्मांचेच आचरण करीत असतात. ज्या वेळेस लोक दरिद्री विपन्न असतात त्या वेळेस त्यांची सेवा करून त्यांना सुखी करणें हा ओघप्राप्त धर्म आहे. परंतु हे सार्वजनिक सेवा करणारे सारे कर्मयोगी झालें असें अनुमान नाहीं काढायचें. लोक–सेवा करतांना मनांत जर शुद्ध भावना नसेल तर ती लोक–सेवा भयानक होण्याचाहि संभव आहे. आपल्या कुटुंबाची सेवा करतांना जितका अहंकार, जितका द्वेषमत्सर, जितका स्वार्थ आपण करतों तितका सर्व लोक–सेवेंतहि आपण निर्माण करूं. आणि याचें प्रत्यंतर आजच्या लोक–सेवकांच्या मेळाव्यांत दिसूनहि येत आहे.

कर्माबरोबर मनाचा मेळ पाहिजे. हा जो मनाचा मेळ त्यालाच गीता विकर्म म्हणते. बाहेरचें साधें कर्म, हें आंतलें विशेष कर्म. हें विशेष कर्म ज्याच्या त्याच्या मानसिक गरजेप्रमाणें वेगवेगळें असतें. विकर्मांचे असे अनेक प्रकार उदाहरणादाखल चौथ्या अध्यायांत दर्शविले असून त्याचाच विस्तार पुढें सहाव्या अध्यायापासून केला आहे. या विशेष कर्मांची, या मानसिक अनुसंधानाची, जोड देऊं तेव्हांच निष्कामतेची ज्योत पेटेल. कर्माबरोबर विकर्म आलें म्हणजे हळूहळू निष्कामता अंगीं बाणते. शरीर व मन या जर दोन वेगवेगळ्या वस्तु आहेत तर साधनेंहि दोहोंसाठीं वेगवेगळीं असणार. या दोहोंचा मेळ बसला म्हणजे साध्य हातीं पडतें. मन एकीकडे व शरीर दुसरीकडे असें होऊं नये म्हणून शास्त्रकारांनीं दुहेरी मार्ग सांगितला आहे.

भक्तियोगांत बाहेर तप सांगितलें व आंत जप सांगितला. उपवासादिक बाह्य तपस्या चालली असतां जर आंतून मानसिक जप चालला नसेल तर तें तप सारें फुकट गेलें. कोणत्या भावनेनें मी तप करीत आहे ती भावना आंत सारखी पेटत राहिली पाहिजे. उपवास या शब्दाचा अर्थच मुळीं देवाजवळ बसणें. परमेश्वरा-जवळ चित्त रहावें म्हणून बाहेरच्या भोगांना बंदी करायची. परंतु बाहेरचे भोग वर्ज्य करून मनांत जर भगवंताचें चिंतन नसेल तर त्या बाह्य उपवासास काय किंमत? ईश्वराचें चिंतन न करतां जर खाद्यपेयांचें मनांत चिंतन करूं तर तें फारच भयंकर भोजन झालें. हें जें मनाचें चाललेलें भोजन, मनांत विषयचिंतन, यासारखी भयंकर वस्तु दुसरी नाहीं. तंत्राबरोबर मंत्र पाहिजे. केवळ बाह्य तंत्राला महत्त्व नाहीं. केवळ कर्महीन मंत्रालाहि महत्त्व नाहीं. हातांत सेवा हवी व हृदयांतहि सेवा हवी. तरच खरी सेवा हातून घडेल.

## कोमल दयाभाव

हृदयांतील ओलावा जर बाह्य कर्मांत नसेल तर तें स्वधर्माचरण शुष्क राहील. त्याला निष्कामतेची फुलेंफळें लागणार नाहींत. आपण रोग्याच्या शुश्रूषेचें काम समजा सुरू केलें. परंतु त्या सेवाकर्माबरोबर जर कोमल दयाभाव नसेल तर ती रुग्णसेवा कंटाळवाणी व नीरस वाटेल. तो एक बोजा वाटेल. रोग्यालाहि त्या सेवेचा भार वाटेल. ज्या शुश्रूषेंत मनाचा सहकार नसेल तर त्या सेवेंतून अहंकार निर्माण होईल. मी त्याच्या आज उपयोगी पडत आहे. तर त्यानें माझ्या पडावें. त्यानें माझी स्तुति करावी. लोकांनीं माझें कौतुक करावें. वगैरे अपेक्षा चित्तांत उत्पन्न होतील. किंवा आपण इतकी सेवा करतों तरी हा रोगी चिरचिरच करतो वगैरे आपण त्रासिक-पणानें म्हणूं. आजारी मनुष्य साहजिकच चिरचिऱ्या असतो. त्याच्या चिरचिऱ्या स्वभावामुळें मनांत खरा सेवा–भाव नसलेला सेवेकरी कंटाळा करील.

कर्माच्या जोडीला आंतरिक मेळ असला म्हणजे तें कर्म निराळेंच होतें. तेल व वात यांच्या जोडीला ज्योत आली म्हणजे प्रकाश पडतो. कर्माच्या जोडीला विकर्म आलें म्हणजे निष्कामता येते. दारूला बत्ती लावली म्हणजे स्फोट होतो. त्या दारूंत शक्ति निर्माण होते. कर्म ही वस्तु ह्या बंदुकीच्या दारूसारखी आहे. तेथें विकर्माची ज्योत लागली कीं कार्य होतें. विकर्म तेथें येत नाहीं तोंपर्यंत तें कर्म जड आहे. त्यांत चैतन्य नाहीं. एकदां विकर्माची ठिणगी पडली म्हणजे त्या कर्मांत जें सामर्थ्य निर्माण होतें तें अवर्णनीय आहे. चिमूटभर दारू खिशांत राहते, हातांत खेळते. परंतु तिला बत्ती लावतांच शरीराच्या चिंधड्या उडतात. स्वधर्माचरणांतील अनंत सामर्थ्य असेंच गुप्त असतें. त्याला विक-र्माची जोड द्या म्हणजे मग कशा घडामोडी होतात तें दिसेल. अहंकार, काम, क्रोध, यांचा त्या स्फोटानें मुडदा पडेल; आणि त्यांतून त्या परम ज्ञानाची निष्पत्ति होईल.

## प्रेमाची अजब करामत

कर्म हें ज्ञानाचें पेटवण आहे. एखादा लांकडाचा ओंडका पडलेला असतो. परंतु त्या लांकडाला पेटवा. तो धगधगीत निखारा होतो. तें लांकूड व तो अग्नि यांत केवढा फरक! परंतु त्या लांकडाचाच तो अग्नि असतो. कर्मांत विकर्म ओतलें म्हणजे कर्म दिव्य दिसूं लागतें. आई मुलाच्या पाठीवरून हात फिरवते. एक पाठ व त्या पाठीवरून वेडावांकडा एक हात फिरला. परंतु त्या साध्या कर्मानें त्या मायलेकरांच्या मनांत ज्या भावना उचंबळल्या, त्यांचे कोण वर्णन करूं शकेल? इतक्या लांबीरुंदीच्या पाठीवरून अशा इतक्या वजनाचा एक गुळगुळीत हात फिरवावा म्हणजे तो आनंद निर्माण होईल, असें जर कोणी समीकरण बसवूं पाहील तर तो थट्टा होईल. ती हात फिरविण्याची क्षुद्र क्रिया; परंतु त्या क्रियेंत आईचें हृदय ओतलेलें आहे. तें विकर्म ओतलेलें आहे. म्हणून तो अपूर्व आनंद मिळतो. तुलसीरामायणांत एक प्रसंग आहे. राक्षसांशीं लढून वानर येतात. ते जखमी झालेले असतात. अंगांतून रक्त वाहत असतें. परंतु प्रभु रामचंद्रांनीं नुसतें प्रेमपूर्वक त्यांच्याकडे पाहिलें आणि त्या वानरांच्या वेदना नाहींशा झाल्या. त्यावेळेस रामानें डोळे उघडले होते त्याचा फोटो घेऊन त्याप्रमाणें दुसऱ्या कोणीं आपले डोळे उघडून पाहिलें असतें तर तसा परिणाम झाला असता कां? तसें करूं पाहणें हास्यास्पद आहे.

कर्माला विकर्माची जोड मिळाली म्हणजे शक्तिस्फोट होतो व त्यांतून अकर्म निर्माण होतें. लांकूड जळल्यावर राख होते. तो पहिला भला मोठा ओंडका; पण चिमूटभर निरुपद्रवी राख होते त्याची! खुशाल हातांत घ्यावी व अंगाला फांसावी. कर्माला विकर्माची ज्योत लावल्यानें अकर्म होतें. लांकूड कोठें व राख कोठें? कः केन संबंधः! त्यांच्या गुणधर्मांत आतां बिलकुल साम्य नसतें. परंतु त्या ओंडक्याचीच ती राख यांत संशय नाहीं.

## आईचें मारणें

कर्मांत विकर्म ओतलें म्हणजे अकर्म होतें. याचा अर्थ काय? याचा अर्थ हा कीं कर्म केल्यासारखें वाटतच नाहीं. त्या कर्माचा बोजा वाटत नाहीं. करून अकर्ते होतों. गीता म्हणते मारूनहि तुम्हीं मारीत नाहीं. आई मुलाला मारते म्हणून तुम्हीं मारून पहा बरें. तुमचें मारणें मुलगा सहन करणार नाहीं. आईनें मारलें तरी तिच्या पदरांतच तें तोंड खुपशील, कारण आईच्या बाह्य कर्मांत चित्तशुद्धि आहे. तिचें ते मारणें निष्काम आहे. तिचा स्वार्थ त्या कर्मांत नाहीं. विकर्मांमुळें, मनाच्या शुद्धीमुळें कर्मांचा कर्मपणा उडून जातो. रामाचें तें पाहणें आंतरिक विकर्मांमुळें केवळ प्रेमसुधासागर असें होतें. परंतु रामाला त्या कर्माचा श्रम नव्हता. चित्तशुद्धिनें केलेलें कर्म निर्लेप असतें. त्याचें पापपुण्य कांहीं उरत नाहीं.

नाहीं तर कर्मांचा केवढा बोजा आपल्या बुद्धीवर व हृदयावर पडतो. किती ताण पडतो. आपण कर्मांच्या बरेवाईटामुळें व्यग्र असतों. कर्म आपणांस सर्व बाजूंनीं घेरतें. कर्म आपल्या मानगुटीस जणुं बसतें. समुद्राचा प्रवाह जोरानें जमिनींत घुसून जशीं आखातें निर्माण करतो, त्याप्रमाणें कर्मांचा जोजार चित्तांत घुसून तेथें क्षोभ निर्माण होतो. सुखदुःखाचीं द्वंद्वें निर्माण होतात. सारी शांति नष्ट होतें. कर्म झालें होऊन गेलें तरी त्यांचा वेग शिल्लकच राहतो. कर्म चित्ताचा कबजा घेतें. मग त्याला झोंप येत नाहीं.

परंतु अशा या कर्मांत विकर्म मिळविलें तर कितीहि कर्म केलें तरी श्रम वाटत नाहीं. मन ध्रुवाप्रमाणें शांत, स्थिर व तेजोमय राहतें. कर्मांत विकर्म ओतल्यानें तें अकर्म होतें. कर्म करून पुसून टाकल्यासारखें होतें.

**कर्मांचें अकर्म कसें होतें ?**

हें कर्मांचें अकर्म कसें होतें? ही कला कोणाजवळ पहावयास मिळेल? संतांजवळ. गीतेंत भगवान् सांगतात, "संतांजवळ जाऊन बैस व धडे घे."


## जनतेचे आरोग्य म्हणजेच राष्ट्राचे सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठीं बलवान बनाः**—यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्डें, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रें, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहाः...



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

कर्माचें अकर्म कसें होतें हें सांगतांना भाषा संपून जाते. त्यांची कल्पना येण्यास संतांच्या पायांशीं गेलें पाहिजे. परमेश्वराचें वर्णन आहे ना—

" शांताकारम् भुजगशयनम् "

परमेश्वर सहस्त्र फणांच्या शेषावर पहुडला असतांहि शांत आहे. संत सहस्त्रावधि कर्में करीत असूनहि इवलादेखील क्षोभतरंग मानससरोवरांत उठूं देत नाहींत. अशा प्रकारची खुबी संतांच्या गांवीं गेल्याशिवाय समजणार नाहीं.

हल्लींच्या काळांत पुस्तकें स्वस्त झालीं आहेत. आणा दोन आण्यांत गीता, मनाचे श्लोक, मिळतात. गुरु भरपूर आहेत. शिक्षण उदार व स्वस्त आहे. विद्यापीठें ज्ञानाची खिरापत वांटीत आहेत. परंतु ज्ञानामृत भोजनाचे ढेंकर कोणी देत नाहीं. पुस्तकांचा हा ढीग पाहून संतसेवेची अधिकच गरज दिवसेंदिवस भासूं लागली आहे. पुस्तकांच्या मजबूत कापडी बाइंडिंगच्या बाहेर ज्ञान येत नाहीं. एक अभंग मला अशा प्रसंगीं नेहमीं आठवतो.

**काम क्रोध आड पडिले पर्वत राहिला अनंत पैलीकडे ॥**

कामक्रोधांच्या पर्वतापलीकडे नारायण असतो. त्याप्रमाणें या पुस्तकांच्या राशीमागें ज्ञानराजा लपून बसला आहे. पुस्तकालयें व ग्रंथालयें सर्वत्र झळकत असतां अजून मनुष्य सर्वत्र संस्कारहीन व ज्ञानहीन असा माकडच दिसून येत आहे. बडोद्यास मोठी लायब्ररी आहे. एकदां एक गृहस्थ भलें मोठें पुस्तक घेऊन जात होते. त्या पुस्तकांत चित्रें होतीं. इंग्रजी आहे असें त्या गृहस्थांस वाटून ते नेत होतें. मीं विचारलें, " कसलें आहे पुस्तक ? त्यांनीं पुढें केलें. मीं म्हटलें, " हें तर फ्रेंच आहे. " ते गृहस्थ म्हणाले, " फ्रेंच निघालें वाटतें ! " परम रोमन लिपि, सुंदर चित्रें, चांगलें बाइंडिंग, मग ज्ञानाला काय तोटा !

इंग्रजी भाषेंत दरसाल दहा दहा हजार नवीं पुस्तकें तयार होतात. इतर भाषांत तोच प्रकार. ज्ञानाचा प्रसार असतांहि मनुष्याचें डोकें खोकें कसें ? कोणी म्हणतात स्मरणशक्ति कमी झाली. कोणी म्हणतात एकाग्रता होत नाहीं. कोणी म्हणतात जें जें वाचावें तें खरेंच वाटतें. कोणी म्हणतात विचार करावयास वेळच नाहीं ! श्रीकृष्ण म्हणतात, " अर्जुना, ऐकून ऐकून घोटाळ्यांत पडलेली तुझी बुद्धि स्थिर झाल्याशिवाय योग तुझ्या हातांत पडणार नाहीं. ऐकणें वाचणें आतां पुरें करून संतांना शरण जा. तेथें जीवनाचा ग्रंथ तूं वाचशील. तेथील मुकें प्रवचन ऐकून छिन्नसंशय होशील. सारखीं सेवाकर्मे करूनहि अत्यंत शांत कसें रहावें, बाहेरच्या कर्मांचा जोर असतांहि हृदयांत अखंड संगीताची सतार कशी लावावी, हें तेथें गेल्यानें कळेल. "

---

# परमार्थी आणि तत्संबंधीं विचार

—श्री निसर्गदत्त महाराज

**श्री सिद्धरामेश्वर महाराज यांचे एक पट्टशिष्य श्री निसर्गदत्त महाराज हे आधुनिक काळांतील एक थोर संत असून प्रवचनांच्याद्वारें जनतेला सुबुद्ध करण्याचें त्यांचें कार्य अव्याहत चालू असतें. 'परमार्थी आणि परमार्थिक विचार' या विषयावरील त्यांचें पुढील प्रवचन आमच्या वांचकांचें मार्गदर्शन करील अशी अपेक्षा आहे.**

परमार्थी म्हणजे परमार्थाचा विचार करणारा, परम अर्थ, उत्तम अर्थ. उच्च अर्थ, योग्यसा अर्थ, निर्मळ अर्थ, प्रथम भावना, ईश्वर स्मरण, ईश्वरभजन, ईश्वर दर्शन, यालाच शास्त्राकार पूर्वार्ध असेंहि म्हणतात. पूर्वार्धाचा योग्य अर्थ लागल्यावर ईश्वराचें दर्शन घडतें, त्याचाच परिणाम उत्तरार्धामध्यें स्वरूपस्थिति निश्चयाची असा होतो. पारमार्थीकाला परमार्थ करण्याचें कारण आत्महित, आत्मसंपन्नता आत्मसुख-रूपता, आत्मपूर्णता, आपल्या उपजीविकेला सुख आनंद आणि शांतिकरितां भरपूर म्हणजेच पूर्ण, सदा पुरेल अशी विपुल संपत्ति पाहिजे, असा हेतू हाच परमार्थाचें मूळ कारण आहे. शरीर आणि जग अनुभवांत आल्यापासून हवेसें वाटते तसें मिळत नाहीं आणि नको तसलेच भोगून जीव कंटाळतो. मनाप्रमाणें सर्व सर्व कांहीं व्हावें हा हेतू दृढतर असतांना सर्वच कांहीं प्रकार अगदीं मनावेगळेच भोगावे लागतात. मनासारखें झालें असें कांहीं वाटतें व वाटतें तोंच, मुळींच आवडत नाहीं असा प्रकार झटदिशी (जीवाच्या) अनुभवाला येतो. पूर्णपणें नापसंत असूनहि त्याला तो स्वीकारावाच लागतो, तसा तो स्वीकारून भोगतो. हमेशा असाच प्रकार चालू राहिल्यामुळें कोणी प्राणी या प्रकारचा अगदीं वीट मानतो, याप्रकारचा पूर्णपणें वीट आलेला प्राणी हा प्रकार शमविण्याकरितां जेव्हां चोहोंबाजूला पाहूं लागतो तेव्हां त्या अवस्थेला बुधजन त्रिविधतापें पोळलेला असें म्हणतात. त्रिविधतापानें जो पोळला तोच परमार्थाचा आधिकारी झाला, परमार्थ मार्ग चालूं लागला अशी सुरवात होते. कांहींना कांहीं प्रकारानें यांची गरज भागतें आहे; आज ना उद्यां आपलें कांहीं बरें होईल अशा आशेनें कोरडे समाधान मानून बहुसंख्य जीव आत्मविचार न करितां तसल्या स्थितींत दुःख, कष्ट भोगून अंतीं धडपड हातपाय आपटीत, दांतचावत, वेडेवांकडे हातवारे करीत तसल्या स्थितींत मरतात; परंत

मनाविरुद्ध भोगाव्या लागणाऱ्या जाचाला कंटाळून जो परमार्थमार्गी झाला तो वर लिहिलेल्या उल्लेखाप्रमाणें ईश्वरस्मरण, ईश्वरभजन, करूं लागतो. इथेंच परमार्थांतील मुमुक्षु अवस्थेला सुरुवात होतें. इथेंच त्याला ईश्वरभजन, पुजन इत्यादि क्रिया करीत असतांना थोडाथोडा आनंद मिळूं लागतो, या मुमुक्षु अवस्थेंत त्याला इतर कांहीं सहाय्यार्थी पण मिळूं लागतात; होवून गेलेले ईश्वराचे अवतार, ऋषि, योगी, मुनी, जपी, तपी, साधुसंत इत्यादिकांचे चरित्रवाचन, नामसंकीर्तन, प्रतिमादर्शन वगैरे नित्य निदिध्यासामुळें त्या प्रतिमांची चैतन्य दर्शनें, संभाषणें इत्यादि झाल्याचा भास होऊं लगेतो, त्यामुळें त्याची मनीषा सुखावू लागते. ह्या प्रकाराला आपणांला ईश्वरी साक्षात्कार झाला या समजुतीनें तो प्राणी अधिक आवडीनें स्मरण, भजनपुजन, क्रिया वाढवीत राहातों.

अशा मनःस्थितींत त्यानें भक्तिभावनेनें मानलेले आराध्यदैवत त्याच्या दृष्टीसमोर वरचेवर दिसूं लागतें. त्यालाच तो भाविक आपल्याला ईश्वरी साक्षात्कार झाला आहे असें मानून समाधान भोगतो, तोंच कोणा सत्पुरुषाची किंवा ज्यांना सद्गुरु असें म्हणतात अशांची गांठीभेटी होते. (उदाहरणार्थ नामदेवाला श्रीविठ्ठलाचें दर्शन वगैरे) त्या सत्पुरुषाची भेट झाल्यावर, तो सत्पुरुष हें (साक्षात्कार वगैरे) सत्य ईश्वराचें दर्शन नव्हे त्याच्याहि पलिकडे आत्मज्ञानानें देवाचें सत्य दर्शन झालें पाहिजे असें सांगतो. इथेंच त्या भाविकाची मुमुक्षु अवस्था संपून साधक अवस्थेंत प्रवेश होतो. साधक अवस्थेंत प्रवेश झाल्यानंतर सांप्रत वापरीत असलेल्या शरीराचें त्याला ज्ञान देऊन आंतील वावरत्या अंतरात्म्याचें ज्ञान म्हणजे परिचय करून दिला जातो. पुढें शरीराबाहेरील पंचमहाभूतें, त्यांची चतन्यक्रिया, प्रकाशनक्रिया, गुणावगुण वगैरेचें ज्ञान त्याला होऊं लागतें. पंचमहाभुतांचें उद्भवकारण, त्याचें आकलन त्यास होऊं लागतें, ह्यावेळीं त्याचा चित्तधर्म

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

**महिला वस्तु भांडार**

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**
यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें
लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.
छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)
❋ आमची कोठेंही शाखा नाहीं. ❋

अति शुद्ध व शांत होऊ लागतो आणि हा प्रकार अंतर्यामींच्या अति सूक्ष्म केंद्रांतूनच त्याला प्रचीतभावाला येत असतो. तिथेंच त्याला चैतन्य देयाला चेतविण्याचे कारण किंवा अवस्था उद्भव कां आणि कसा होतो याचें दर्शन घडतें यथार्थ दर्शन झाल्यावर त्या बोधकर्त्या सद्गुरु सत्स्वरूपाचे निर्मळ, अविनाशी स्वरूप त्याला प्राप्त होते. इथेंच साधकदशा पूर्ण होते.

पारमार्थिकानें परमार्थ करावयाचा तो अहर्निश परमार्थ केला पाहिजे असें संत शिरोमणि तुकारामांनी म्हटलेलें आहे. क्षणक्षणां उद्भवणाऱ्या विचाराचा उपयोग खास आत्म परिचयाकरितां म्हणजेच आपल्या परिचयांकरितां करीत राहिलें पाहिजे. आपण स्वतःच कसा आहे, सांप्रत आपण आहे तरी काय, आपला अनुभव आपणाला केव्हांपासून झाला आहे, कसा होतो आहे कां होतो आहे, याचा क्षणक्षणां हिशेब घेत राहिले पाहिजे. पंचज्ञानेंद्रियें आणि त्यापासून येणारा अनुभव, व होणारे ज्ञान, यांच्यामुळें सुखदुःखाचा अनुभव घडतो आहे त्यांच्यामुळें होणारे परिणाम भोगणारा आपण म्हणजे तरी काय आणि कसा आहे याचा करून विचार घेत राहिलें पाहिजे. पंचज्ञानेंद्रियांचे ज्ञान आपणाला जेव्हां होत नाहीं, त्यावेळीं आपला अनुभव आपणांस काय येतो याचा अर्थ लावला पाहिजे. आपल्या शरिरांतील आपण, आणि कोणाएकां अन्य शरीरांतील विश्वविख्यांत थोर विभुती, ती पण त्या एका शरिरांतील आणि आपणही तसल्याच एका शरिरांतील. ती अगदीं थोर विभूती आणि आपण अगदीं लहान, हें असें काय याचा अर्थ लागला पाहिजे. आपल्या शरिरांतील अंतर्यामीची जात आणि ती थोर विभूती म्हणून असलेलीं त्याच्या अंतर्यामीची जात एकच की वेगळी ? त्या थोर विभूतिकरितांही उदयकाळ उल्लेल होतो आहे, आपलाही होतोच आहे. तरीपण एवढा मोठा फरक पडलेला आहे. हा तरी कां आणि कसा ? पंचज्ञानेंद्रियानीं अनुभव भोगणारी जात जर दोन्ही ठिकाणीं एकच आहे, तर एवढा फरक कां असावा याचा सदा अर्थ लावला पाहिजे.

त्या थोर विभूतिचा शब्दउल्लेल सद्गुरु, आणि आपण फक्त आपल्या मुखावाटें नुसतें गुरुगुरु, भजन भावाचें भावार्थ हो मुखें गुरुगुरु आणि आपणाला थोरपणा नाहीं म्हणून अंतर्यामी गुरुगुरु: त्या थोर विभूतिच्या अंतर्यामीं पूर्णशांतिसागर सद्गुरु आणि आपल्या ठायीं नाना अधार्मिपणाचा गुरुगुरु यांचा उत्तम अर्थ लावला पाहिजे. खऱ्या अर्थाला अर्थ म्हणणें आणि अनर्थाला हीं अर्थ म्हणणें याचा अर्थ कळला पाहिजे. सांप्रत या शरीरांतील आपण आणि सदा सर्वदा असणारा आपण याचा उत्तम अर्थ लावला पाहिजे. सांप्रत शरीरांतील आपण हा मुदतीवर अनुभव घेणारा आपण आहे. सदा सर्वदाचा आपण कसा

असतो त्याचें रूप काय? वसतिस्थान काय? त्याला भरण पोषणाला काय लागतें हें कळल्याशिवाय मिळवावे तरी काय हें तरी कसें कळणार? विश्वांतील पुरोहिताच्या सांगण्याप्रमाणें केलेला दानधर्म खास आपणाला विपुल सुख-समाधान मिळण्याकरितां, जो आपण करतो तो आपणाला कुठे आणि कसा भोगतो? त्या काळीं, त्या ठिकाणीं आपलें रूप काय असणार? पुरोहिताच्या म्हणण्याप्रमाणें आत्महिताकरितां केलेला दानधर्म कोणत्या आकारानें आपण तेथें भोगतो? दानधर्म करितांना कोणतें रूप, आकार हिशेबी धरिले आहे आहे आणि त्या काळीं त्या ठिकाणीं कोणतें रूप, आकार असणार याची खात्री झाली पाहिजे. बारीक विचार करितांना ऐहिक, पारमार्थिक व्यवहार आंधळे दळतें आहे आणि कुत्रें पीठ खातें असा अनुभव येतो आहे, म्हणून पारमार्थिकानें दुसऱ्याची उठाठेव न करितां आपला समूळ अर्थ लाविला पाहिजे; कारण केलेल्या कर्मांचा उपयोग आडमार्गाला जावूं नये. अहर्निश सदा परमार्थ करावा, पाय आड मार्गाला जावूं देऊं नये म्हणून चालत्या पायांचा मूळ पाया हुडकून काढला पाहिजे. स्वतःचा परम अर्थ लावावयाचा सोडून जे इतर अर्थ लावूं लागले ते वहातची गेले, आणि जे स्वतःचाच अर्थ लावीत गेले ते स्वरूपाच्या मूळाकडे जाऊन हरिस्वरूपचि झाले. "स्वस्वरूप तेंच सत्स्वरूप, तेचि संत" इतर ते असंत उगाच भांड भांडोनि मेले; म्हणून परम अर्थ लाविला पाहिजे. या रीतीनें परमार्थ करावा.

परमार्थ हा शब्द महान् आहे. त्याचें स्वरूप फार मोठें व्यापक आहे. कोणीतरी साधारण जीव उठून उभा राहून म्हणतो मी परमार्थ जाणतों, तर हे


MATUNGA CLANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लानिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ ( मालक: एस्. व्ही. प्रधान

त्याचे ते केवळ बालिश बोल आहेत. कारण परमार्थच सर्वांचा सर्वस्व आहे. तो किती थोर आहे, किती गहन आहे, त्याला प्रमाण आणि उपमा कुटलीही जरी समोर धरली तरी ती गळून अदृश्य होणार. फार काय महत्शक्ति चैतन्य, महत्तत्त्व ज्याला म्हणतात तें त्याच्यापुढें थोरवीनें आणि आयुष्यानें ठेंगणें पडतें, त्याच्या बरोबरीनें काळ भोगायला अपूर्ण पडते, तरीपण महत्तत्त्व ज्याला म्हणतात तीच महत्शक्ति पुन्हां पुन्हां त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करीत असते. परमार्थ चिंतन महासुखदायी आहे. व्यक्ति स्मृतीनें जाणपणें जाणूं जाणारें स्वतःला न कळतच त्याच्यामध्यें गडप होतात. कोणी विरळा, कीं जो महत्तत्त्व चैतन्य शक्तीचा मूळ अणूं समोर ठेवून त्या वेदीवर परमार्थ चिंतनाचा महा सुखोपभोग भोगतो. इतर पुष्कळ असे आहेत कीं जें आपण परमार्थी आहोंत असे समजून आपणच पूर्ण आहोंत असे मानतात. इतर जनसमुहानें आपल्याला सर्वस्वी मानावें, आपला शब्दान् शब्द मानावा आपण जें काय म्हणूं तें तें बहुजनसमुहानें आपल्याला द्यावे, आपल्याला पुरें करावें, या अपेक्षेनें जनांकडे पाहातात. लोकही आत्महित भावनेनें त्यांच्याकडे धांवतात, ते म्हणतील त्याप्रमाणेंच वावरूंही लागतात. तरीपण आपण पूर्ण मानून असलेला तो परमार्थी संतोषपुष्ट होत नाहीं, तेणेंकरून विश्वजन त्रस्त होतात व त्यामुळें लोक हळुहळूं त्याच्या म्हणण्याची हेळसांड करूं लागतात.

आपण पूर्ण मानणारा हा परमार्थी कोण जाणें खोल अशा खळग्यांत पडलेला असतो. लोकांनीं त्याच्या म्हणण्याप्रमाणें आपल्या हाडाची काडें जरी केली तरीपण त्या खळग्यांतून तो वर आल्याची चिन्हें दिसत नाहींत. त्याची नाना प्रकारची विषय भोगाची हांव वाढतच असते, असें लोकांच्या अनुभवाला येतें. त्याच्या पंचविषयाच्या खादाडपणाची हांव पुरी होऊन मला आतां पुरें, लोकहो, तुम्हांला घ्या, तुम्ही खा. सर्व सुखोपभोग, आनंदी आनंद तुम्ही भोगा. मी आतां पुरेपूर संतुष्ट आहे. पंचविषयाचा नैवेद्य त्याच्या समोर ठेवलेला, त्याच्या सभोंवार त्याला दिसत असणारा, आपल्या दृष्टीचें निर्मळ पाणी फिरवून जगाला तो नैवेद्य परत करणें असा हा तृप्तीचा ढेकर तो कधीं देणार आहे कोण जाणें! त्याच्याकडून तृप्तीचा ढेकर सुखावह मिळण्याच्या बदलीं लोकांना आपलीच आहुति, त्याच्या नैवेद्य भरण पात्रामध्यें पडतें आहे, असा अनुभव त्याच्या चाहातेजणाला येतो. देवभक्ति, गुरुभक्ति, परमार्थ करणें इत्यादि नाम-उल्लेखानें लोकांना सळो कीं पळो करून सोडणारा हा परमार्थी परमार्थपूर्ण आहे. असें स्वतःच फक्त मानतो, लोकांचीं मात्र खात्री त्याच्याबद्दल होत नाहीं. जे परमार्थं परिपूर्ण असतात त्यांची आवड तरी काय, त्यांना आम्ही काय पुरवावें, त्यांची कोणती सेवा अधिक करावी असे लोक शोधीत असतात. तरीपण सहज निरिच्छ, सहज तृप्ति, सहज शांति, सहज प्रसन्न मुद्रा, स्वानंदघनपुरुष कशाची इच्छा

करीत नसल्यामुळें लोक आपापल्या आवडीप्रमाणेंच परमार्थ पोषक धर्म क्रिया अति उत्साहपूर्णतेनें करीत असतात. त्या करीत असतांना आपण श्रमलो, भागलों, त्रासलों असा त्यांना ( लोकांना ) अनुभव येत नाहीं. याच्या उलट आपल्या मनाप्रमाणें अधिक आपल्याला करितां येत नाहीं, म्हणून ते लाजल्यासारखे थबकून असतात. वरतःच्या उत्साहानें खर्च वेंच करीत असतांना एकमेकांना हिशेब सांगतांनाही ते लाजतात. थोरवी समोर थोरवी अशीच लाजत असते. थोरवी समोर थोरवी केव्हांही उद्धटपणा, अतिशयोक्ति दाखवूं शकत नाहीं.

थोरवीची प्रेमळता सदाच अतिलीन, शांत, सुखी असते. सुख सहिष्णुता शांति इत्यादीची लक्षणें ज्याच्या त्याच्या अंगींच ज्याला त्याला अनुभवांत असली पाहिजेत. जसें आपणाला ताप आलेला कळतो, दुखतें आहे कळतें, तहान भूक कळते, झोंप, जाग्रण कळतें, नानाप्रकारच्या पीडा कळतात, त्याचप्रमाणें 'साधुसंत' शब्दानें उल्लेखित लक्षणें आपल्या अंगीं भोगत असलेली आपल्याला कळत असलेली प्रत्यक्ष दिसली पाहिजेत; जसें जेवून तृप्त आहे, झोंप पुरी होऊन उठला आहे रोगव्याधी बरी झाली आहे, आतां मला जरापण वाढूं नका, आतां मला झोप येणार नाहीं, आतां मला रोग व्याधि कांहीं नाहीं असें स्वानुभवानें सांगतो, आतां औषधाची मुळींच गरज नाहीं, रोग पूर्णपणें बरा झाला; असाच साधुसंत हरिभक्त उल्लेखित शब्दाचा अनुभव प्रत्यक्षपणें ज्याचा आहे, तो इतरांच्याहि खात्रीला आपोआपच येतो, टाहो फोडून सांगावयास लागत नाहीं. उत्तम वस्तु उत्तम जिन्नस ह्यांचे गिऱ्हाईक दवडल्यानेंहि मागें जात नाहीं, असाच अनुभव उत्तम पारमार्थिकाचा असतो.

---

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८

# बाबांचा भक्तजनांस उपदेश

हे जगजीवना, गोविंदा, गोकुलेन्द्रा, कमलनयना, आनंदचंद्रा, रमामाधवा, साईनाथा ! तुझ्या तेजानें तेजोमय झालेली तुझी ही लेंडीबाग जीवनांत दिव्य आनंद निर्माण करीत आहे. ब्रजलाल नंदकिशोर, वृंदावनांत आहे तर जगज्जीवन साईमोहन शिरडींतील लेंडीबागेंत आहे. यशोदामातेच्या मांडीवर खेळणारा गोविंद, नंदवाड्यांत रांगणारा नंदन, वृंदावनांत वन्सीवटाखालीं वेणू वाजविणारा मनमोहन; लेंडीबागेच्या उपवनांत अवतरला आहे. हें ठिकाण म्हणजे थकल्या भागल्या जीवांचें विश्रांतीचें केवळ नंदनवन. महाराजांच्या मंदिरापासून जवळ आहे. ह्या जागेंत पूर्वी बाबा रोज नित्य नियमानें सकाळीं शौचविधीस जात. त्यावेळीं तेथें तरटाचीं व निंबवृक्षाचीं झाडें होतीं, त्या झाडांना बाबा स्वतः पाणी आणून घालीत. या बागेच्या भूभागांत जमिनीचे दोन भाग करून एक अति लहान अत्यंत जुनीं लेंडी नांवाची प्रसिद्ध नदी ( नाला ) सरळ वहात आहे. उन्हाळ्यांत तिला अति थोडें पाणी असतें. या नाल्याच्या शुष्क पात्रांत बाबा नेहमीं प्रत्येक दिवशीं चांदीचीं नाणीं फेंकीत असत.

एकदां याच ठिकाणीं त्या लहानशा नाल्याच्या पात्रांत, पसरणाऱ्या वेलीच्या कमानीच्या एका लहानशा खांचांत, खरोखर जणूं काय भक्त भाऊचें ( कै. रघुवीर पुरंदरे, वांद्रे ) मन पहाण्याकरितां बाबांनीं अत्यंत विलक्षण डोळे दिपविणारीं, महा-तेजस्वी, रसरशीत ( अग्निज्वालेप्रमाणें ) प्रकाशणारीं अत्यंत जड ( भरीव ) अशीं शुद्ध सोन्याची तीन वेटोळीं दाखविलीं.

ह्या नाल्यापासून जवळच असणाऱ्या, पिंपळ–निंबवृक्ष झाडांच्या बुंध्याशीं बाबा प्रत्येक दिवशीं तास तास बसत. याच झाडाजवळ बाबांचें स्मारक म्हणून उत्तम दीपगृह बांधलेलें असून त्यांत सतत नंदादीप तेवत आहे.

हे गोपीजनवल्लभा नंदकुमारा योगेश्वरा ! तुझ्या कृपेनेंच ह्या बागेचा, उपवनाचा उदय झाला. हें उपवन स्वर्गांतील नंदनवनास सुद्धां मागें टाकील. आम्रवृक्ष डोलत आहेत. फुलांचा परिमळ दरवळत आहे. पक्षी गान करीत आहेत. मुंगूस, सर्प व इतर प्राणी मजेनें रहात आहेत. कोकिळेच्या मधुर स्वरांनीं कर्णेंद्रियें तृप्त होत आहेत. केळीच्या झाडांनीं सुशोभित व गोड पाण्याच्या आस्वादानें तृप्तेची पूर्णता झाली आहे. अशा ह्या तुझ्या तेजः–प्रभेंत तुझीं लाडकीं लडिवाळ प्रिय बालकें विश्रांति घेत आहेत, तर कित्येक प्रेमानंदांत नाचत बागडत आहेत. हे साईप्रभो ! तुला डोळ्यांत सांठवावें, तुला पहावें, आलिंगन द्यावें, चरणीं लोळावें, ही भक्तजनांची लालसा त्वां पूर्ण केली आहेस.

प्रभो ! धन्य तुझी आणि तुझ्या लीलेची !! भक्तजनांच्या कल्याणाकरितां याच बागेंत एक लक्षानशीं पायऱ्यांची सुंदर जिवंत गोड पाण्याची भक्तगणांच्या मदतीनें स्वतः प्रभो साईराया त्वां एक विहीर बांधलीस !!! ही बाग म्हणजे जीवनांत चैतन्याचा खुळखुळ वहाणारा झराच ! तिचें वर्णन काय व कसें करूं ?

कांहीं वर्षांपूर्वी बाबांचे परम भक्त रावबहादुर के. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांनीं ही बाग विकत घेऊन बाबांना अनन्य भावानें समर्पण केली.

इ. स. १९१० सालीं रावबहादुर मो. वि. प्रधान प्रथम शिरडीस गेले. पहिल्या खेपेस त्यांना आठ दिवस ठेवून घेतलें. घरीं जाण्याची आज्ञा मागितली कीं, "काय आपण रानांत आहोंत, जाऊं संध्याकाळीं." संध्याकाळीं विचारलें कीं "उद्यां पाहूं.' असें आठ दिवस शिरडींत राहून घेतलें.

ह्या आठ दिवसांच्या कालांत, एका गुरुवारीं बाबा लेंडीवरून परत येऊन एक तास झाला होता, त्यावेळीं नानासाहेब चांदोरकरांचे दोन मुलगे बाबू, बापू व प्रधान साहेब बाबांचे पाय चेपणें चाललें असतांच तेथें गेले; त्यावेळीं बाबा प्रधानांना म्हणाले, 'भाऊ' ( पुढें त्यांना प्रधान असें म्हणत.) 'चल मजसंगाती' व एकदम उठले. बाबा, बापू, बाबू, प्रधान हे चौघेही लेंडीबागेकडे आले. मे महिना, भर दोन प्रहरीं बाबा लेंडीबागेकडे आले व वडाच्या झाडाखालीं उभे राहिले. त्यावेळेस ती बाग म्हणजे एक ओसाड पडीक जमीन—व म्हणाले, 'भाऊ, इकडे ये' बाबांनीं त्यांच्या खिशांत हात घातला व कांहीं दाणे त्यांच्या (प्रधान) हातीं दिले व म्हणाले, 'हे घे व तूंच त्या जागेवर फेंक.' व स्वतः टमरेलांतून पाणी आणून त्यावर शिपडलें. इतक्यांत ही वार्ता कर्णोपकर्णी झाली व मंडळी लेंडीबागेंत आली. 'घाला या दाण्यावर पाणी' तेव्हां सर्व भक्त मंडळीनें पाणी घातलें व परत मशिदींत परतले. त्यावेळीं ह्या कृतीचा अर्थ कोणास समजला नाहीं.

प्रभूचा स्वयंप्रकाश जगभर पसरला व भक्तगणांची मुग्यांसारखी रांग लागली. भक्तगण श्रीप्रभु साईरायांचें गुणगान करीत लेंडीबागेवर वाजत गाजत सकाळीं ९।१० च्या सुमारास श्रीसाईबाबांना घेऊन जाऊं लागले. तेथें गेल्यावर प्रभूला स्वानंदलोकांत सोडून सर्व मंडळी परत येत. सकाळचा फराळ वगैरे करून ११–१२ च्या सुमारास सर्व मंडळी प्रभूला आणावयास जाई व वाद्यांच्या व नामघोषाच्या गजरांत श्रीसाई-कृष्णाला परत मशिदींत—द्वारकामाईत आणीत.

ही पद्धत सुरू झाल्यानंतर इ. सन १९१८ मे महिन्यांत सर्व मंडळींना एक आठवडा राहाण्याकरितां घेऊन येतों असें रा. ब. प्रधानांनीं श्रीबाबांना कळविलें, त्यावेळेस बाबा बुटींना म्हणाले. 'बापुसाब, परधान मंडळींस तुझे वाड्यांत दक्षिण भागच्या खोल्या साफ करून दे.'

प्रधान शिरडींत गेल्याबरोबर मंडळीसह बाबांच्या भेटीस गेले. त्यांच्या कुटुंबानीं बाबांच्या पायांवर मस्तक ठेवलें, त्याबरोबर बाबा म्हणाले, 'पहा, लेकरा-बाळांना घेऊन घेऊन मला ही भेटली.' ह्या बोलण्याचा अर्थ त्यासमयीं कुणाला उमगला नाहीं. ह्या वेळेस प्रधान मंडळी एक महिना शिरडींत होती. एके दिवशीं लेंडीबागेवर जन-समुदायांतून जात असतां बाबांनीं 'परधान, इकडे ये.' अशी हांक मारली. त्यावेळेस बाबा औदुंबरवृक्षाखालीं उभे होते. सर्व मंडळी तटस्थ होती. बाबांनीं दोन तीन वेळां मिशांवर ताव दिला व उजवा हात प्रधानांच्या खांद्यावर ठेऊन कांहीं आज्ञा केली व कांहीं बोलले.

ती जागा हल्लींची लेंडीबाग कै. तात्या कोते पाटील यांच्या सहाय्यानें मिळऊन व सगुण मेरु नाईक यांच्या दीर्घ मेहनतीनें फळाफुलांचा बाग —ज्या बागेंत हल्लीं दररोज भक्तगण क्रीडा करीत असतात तो प्रधान ह्यांनीं उठविला, व त्या बागेत बाबांच्या हयातीतच त्यांनीं स्वहस्तें लहानमोठ्या भक्तमंडळींकडून दगड उचलून लहान महातीर्थ—विहिर—वापी बांधली. त्या विहीरीचें पाणी म्हणजे एक महातीर्थच होऊन गेलें आहे व त्या पाण्याच्या रोगनाशक शक्तीबद्दल बरेच लोक तारीफ करीत आहेत.

"शिरडी म्हणजे द्वारकामाई." श्री. के. नारायण अय्यर यांनीं आपल्या "भारतवर्षाचा सनातन इतिहास" या इंग्रजी ग्रंथाच्या व्हॉल्यूम् २ भाग पान ९० येथें द्वारकेची व्याख्या स्कंदपुराणांतून उद्धृत केली आहे; ती अशी :—

**चतुर्णामपि वर्णानां यत्र द्वाराणि सर्वतः ।**
**अतो द्वारावतीत्युक्ता विद्वद्भिस्तत्त्ववेदिभिः ॥**

धर्म, अर्थ, काम, मोक्ष, या चारी पुरुषार्थांना आणि चारही वर्णांना जेथें सर्वत्र द्वारें खुलीं असतात अशा स्थानाला तत्त्ववेत्ते विद्वान् द्वारका असें म्हणतात.


# लहान मुलांच्या आंकडीवर

## जुनें आणि प्रसिद्ध औषध

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

बाबांच्या दरबारांत या चारी वर्णांच्या लोकांनाच नव्हे, तर कै. भागोजी शिंदे सारख्या महारोगी वर्णांतील लोकांनाही दरबाराचीं द्वारें खुलीं असत. तेव्हां बाबांचें निवासस्थान मशीद द्वारकामाईच होय यांत बिल्कुल शंका नाहीं.

शिरडींतील बाबांच्या हालचाली ह्या बोधपर होत्या. प्रत्यहीं लेंडीला जाणें व एक दिवसाआड चावडींत जाणें हें सर्व बोधपर होतें. मशिदींत फकीरांची वस्ती असते; अर्थात् फकीर "फीकरकी काफी करे उसका नाम फकीर." गीतेंत श्रीकृष्णानें प्रतिपादिलेलें—

"यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम" असेंच नाहीं का ?

चावडी म्हणजे खेडेगांवांतील न्यायालय, ग्रामपंचायतीचीं कामें व्हावयाचीं.

**"चावडिये न्यावो अन्यावो। निवडी वेदु ॥"**
**वेदीं अन्यायीं पडे। तो निरयभोगें दंडे।**
**संन्यासी तो सुरवाडे। स्वर्गी जिये ॥** ज्ञाने. अ. १६–२९५–६

ह्यावरून खऱ्याखोट्याचा न्याय, पाप–पुण्य बाबा तेथें करीत. स्वतःच्या फायद्या करितां–कल्याणाकरितां भक्तमंडळी बाबांना हें काम करण्याला लावीत, व भक्तांसाठीं समाधिसोहळा सोडून एक दिवसाआड चावडींत जातो, तसे तुम्हींही तुमच्यांतील सूक्ष्म देहरूपी चावडींत एक दिवसाआड जात जा, व आपले न्याय आपणच वेदाज्ञेनुसार करीत जा, म्हणजे स्वर्ग–मृत्यु–पाताळ वगैरे भोग आपल्या कर्मानुसाराप्रमाणें भोगा बाबा रोज चावडींत नव्हते, यावरून "ठायींच बैसोनी, करा एक चित्त" सर्व काळ मोफत न घालवितां योग्य तें कार्य म्हणजे ज्ञानाज्ञानाचें पलीकडच्या स्थितींत ( मशिदींत ) रहाण्याचें नेहमीं करीत जावें.

लेंडी म्हणजे अज्ञान "लेंडीये आला लोंढा" अर्थात् साकार ब्रह्म भक्तांकरितां अनेक प्रकारचें अज्ञान धारण करून भक्तांना मार्गदर्शन करीत. अज्ञानाचे दोन प्रकार आहेत. ( १ ) अज्ञानाकडे नेणारें अज्ञान. ( २ ) ज्ञानाकडे नेणारें अज्ञान. ज्ञान व अज्ञानाच्या पलीकडे गेलेले बाबा भक्तांकरितां त्या ज्ञानाकडे नेणाऱ्या अज्ञानाच्या लेंडीचा स्वीकार करीत होते. अर्थात् अज्ञानरूपी लेंडींत गेल्याशिवाय–मायेशिवाय ज्ञान नाहीं. "फिकीरकी फाकी करे" असें ठिकाण ज्ञानाज्ञानाच्या पलीकडे आहे. ह्यावरून 'भक्तनके काज प्रभु' सगुणधारी बाबा झाले.

वेदाध्ययन हा महायज्ञ. हा शिरडींत रोज चाले. भक्तांच्या अधिकारानुरूप श्रीबाबा हे कोणाकडून उपनिषदें तर कोणाकडून गीता–भागवतादि ग्रंथ वाचवून घेत. कै. बाळुकाकांकडून सभामंडपांत भगवद्गीता आणि हैद्राबादचें एका शास्त्र्याकडून दिवसा भागवत आणि रात्रीं रा. रा. वझे यांचेंकडून एकनाथी भागवत वाचवीत. रा. ब. साठे साहेबांचे वाड्यांत रा. रा. बापूसाहेब जोग आणि रा. रा. भाऊसाहेब

दीक्षित यांचे वाड्यांत खुद्द दीक्षितांवर हीं कामें सोंपविलीं होतीं. ते दोघे आणि कै. बाळासाहेब भाटे यांचें हस्तें हा यज्ञ होत असे.

स्वधाकारानें पितरांस आणि स्वाहाकारानें देवांस आहुती देणें हा पितृ आणि देवयज्ञ. भूतांना बलिदान हा भूतयज्ञ आणि अतिथींना भोजन दान हा मनुष्ययज्ञ.

बाबा या भूत आणि मनुष्य यज्ञासाठीं रोज ५-७ घरें स्वतः भिक्षा मागत आणि आलेल्या यात्रेकरूकडे इतर अन्नार्थी अतिथींसाठीं माध्यान्हीं जेवणकाळीं कोणाकडून तरी झोळी फिरवीत अशा तऱ्हेनें पंचमहायज्ञ शिरडींत नेहमीं चालत व चालू आहेत.

ज्याची निष्ठा शाबूत त्याला देव पावेलच. निष्ठा आणि सबूरी ह्या दोन सख्या बहिणी प्रपंच-परमार्थांत अत्यावश्यक आहेत. बाबा आपल्या संभाषणांत या दोन तत्त्वांवर जोर देत असत. श्रीसाईबाबांचा सर्वसाधारण उपदेश थोड्या शब्दांत—

"परमेश्वर आहे व त्याच्यापेक्षां कोणी मोठा नाहीं. तो सर्व चराचरांमध्यें भरून उरला आहे. त्याची लीला अगाध आहे. उत्पन्नही तोच करतो आणि मारतोही तोच. तो ठेवील तसें रहावें. त्याच्या मर्जीत आपण राजी रहावें, तळमळ करूं नये. त्याच्या इच्छेशिवाय झाडाचें पान हालत नाहीं. प्रत्येकानें नेकीनें वागावें. सदसद्विचारशक्ति जागृत ठेवावी. आपलें कर्तव्य आपण करावें, पण कर्तेपणाचा अभिमान आपलेकडे न घेतां कर्तृत्व परमेश्वराला द्यावें. आणि फलही त्यासच समर्पण करावें, म्हणजे आपण अलिप्त राहून कर्म आपल्याला बाधक होणार नाहीं. सर्व भूतमात्रांशीं प्रेमानें वागावें. वादावादी करूं नये. कोणी कांहीं बोललें तर ऐकून घ्यावें. कोणाच्या बोलण्यानें आपल्या अंगाला भोकें पडत नाहींत. कोणाची बरोबरी करूं नये. कोणाची निंदा करूं नये. कोणी कांही केलें तरी तिकडे आपण लक्ष देऊं नये. ज्याचें त्याच्या संगें, आपलें आपल्या संगें. कष्ट करीत असावें. रिकामें राहूं नये. देवाचें नांव घ्यावें, पोथीपुराण वाचावें, आहारविहार त्यागू नयेत, पण नियमित असावें.' वगैरे त्यांचा उपदेश गोष्टीरूपानें असे. थोडक्यांत—

'भक्त उद्धारावयाकारणें । रडणें पडणें अडखळणें ॥
पर्वतोपर्वतीं धांवणें । आणि आलिंगणें वृक्षांसी ॥
उमे जाण तूं निश्चित । माझें पाऊल न पडे व्यर्थ ॥
जाणे सदाशिव समर्थ । तुझा भावार्थ तो नाहीं ॥'

त्यांचा एकूण एक शब्द व लीला केवळ भक्तांच्या उद्धारासाठीं होती.

# अगदीं थोडक्यांत गीतासार

**प्राचार्य वामन आबाजी मोडक हे विद्वान, शिक्षणतज्ञ व संस्कृतज्ञ गृहस्थ सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वी होऊन गेले. त्यांनीं त्याकाळीं गीतेचा बारकाईनें अभ्यास करून प्रगट केलेले विचार आमच्या गीता प्रेमी वाचकांस आजही मार्गदर्शक व चिंतनीय होऊन रहाणारे आहेत.**

**स्मरोनि चित्तीं जगदेकनाथा, प्रार्थी तुम्हां सद्गुणशीलवंतां;**
**गीतार्थसारीं अवधान द्यावें, ज्ञानामृता सेवुनि मुक्त व्हावें.**

'सकल आर्यधर्मांचें प्रतिपादक जें आगमनिगमात्मक शास्त्र, त्याचें रहस्य कोणत्या एका ग्रंथात सांगितलें आहे?' असा कोणीं प्रश्न केला असतां त्यास उत्तर असें आहे कीं, अशा प्रकारचा एक ग्रंथ भगवद्गीता या नांवानें सर्व लोकांत प्रसिद्ध आहे. परंतु हा ग्रंथ स्वतंत्र नाहीं. महाभारतांतील भीष्मपर्व नामक विभागांत भगवद्गीतेचा अंतर्भाव होतो. याप्रमाणें महाभारताच्या संबंधानें जरी हा अल्प ग्रंथ अंगभूत आहे, तरी यास सकल शास्त्रांचें केवल रहस्य असें मानिलें आहे. याविषयीं भारतावरील अगदीं अर्वाचीन टीकाकार नीलकंठ चतुर्धर असें म्हणतात—

**भारते सर्ववेदार्थो भारतार्थश्च कृत्स्नशः ।**
**गीतायामस्ति तेनेयं सर्वशास्त्रमयी मता ॥**

**तात्पर्य:**—भारतामध्यें सर्व वेदांचा सारांश; आणि भारताचा सर्व सारांश गीतेमध्यें आहे. म्हणून हिला सर्व शास्त्रसंग्रह असें मानितात.

या ग्रंथाचे अठरा अध्याय आहेत, व हे सर्व अध्याय मिळून श्लोकसंख्या सातशेंवर नाहीं; असें असून या लहानशा ग्रंथाचें तात्पर्य प्रकाशित करण्याच्या कामीं प्राचीन व अर्वाचीन पंडितांनीं जितके परिश्रम केले आहेत, तितके श्रम वेदार्थ प्रकाशित करण्याच्या कामीं देखील कोणी केलें नाहींत. सर्व भारतावर टीका होण्याचें पूर्वीच, या तदंतर्गत अल्प ग्रंथावर मोठीं विस्तृत अशीं भाष्यें कितीएकांनीं लिहिलीं. या ग्रंथावरील टीकाग्रंथापैकीं हल्लीं जे उपलब्ध आहेत, त्यांमध्यें श्रीमच्छंकराचार्य भाष्य हें अगदीं प्राचीन होय. परंतु या भाष्यांत भाष्यकारांनीं भाष्यांत भाष्यकारांनीं पूर्वी असलेल्या टीकांविषयीं उल्लेख केला आहे. त्या कोणच्या व कोणीं केल्या, हें कांहींच समजत नाहीं. तथापि त्या प्रायः द्वैतमतप्रवर्तक असाव्या असें भाष्यकारांच्या लिहिण्याच्या कटाक्षावरून दिसतें. शांकरभाष्याच्या पुढें कांहीं

कालानें श्रीमत् रामानुजाचार्य यांनीं विशिष्टाद्वैतमतपरत्वें गीतेवर भाष्य लिहून प्रसिद्ध केलें. त्यांच्यामागून कांहीं कालानंतर द्वैतमतप्रवर्तक श्रीमन् मध्वाचार्य यांनीं गीतेवर भाष्य केलें. हीं तिन्ही भाष्यें उपलब्ध आहेत; व याचप्रमाणें श्रीवल्लभाचार्य यांच्या संप्रदायानुसारें केवलाद्वैत नामकमतपरत्वें करूनही एक भाष्य झालेलें उपलब्ध आहे, असें माझ्या ऐकिवांत आहे. याशिवाय शंकराचार्यांच्या भाष्याचे मागून ज्या टीका झाल्या आहे, त्यांत अद्वैतमतानुयायी शंकरानंद व मधुसूदनसरस्वती आणि श्रीधरस्वामी, यांच्या टीका सर्वत्र प्रसिद्ध आहेत. श्रीधरस्वामींच्या मागून, वर सांगितलेले भारताचे टीकाकार नीलकंठ चतुर्धर यांची टीकाहि सर्वमान्य आहे. हें गीतेवरील संस्कृत टीकाग्रंथांविषयीं झालें.

आतां अशा सर्वशास्त्रसारभूत ग्रंथावर आपल्या महाराष्ट्र भाषेंतहि कवीजनांनीं परिश्रम करावे हें साहजिकच होय. त्याप्रमाणें, महाराष्ट्र भाषेंत ग्रंथ लिहिण्याची प्रवृत्ति पडतांच, अर्वाचीन साधुवृंदाचे शिरोमणी आणि महाराष्ट्र भाषेंतील आद्य कवि जे ज्ञानेश्वर त्यांनीं गीतेवर टीका केली. ती इतकी उत्तम झाली आहे कीं, तिच्या पुढें कितीएक प्राचीन संस्कृत टीकांची सुद्धां मातब्बरी राहिली नाहीं. भगवतद्गीता हा ग्रंथ फार व्यापक असल्यामुळें त्यांत पुष्कळ गोष्टी फार संक्षेपानें, आणि कित्येक प्रसंगीं केवळ सूत्ररूपानें, सांगितल्या आहेत. परंतु ज्ञानेश्वरांनीं त्यांतील प्रत्येक गोष्टीचा भावार्थ अनेक दृष्टांतांच्या योगानें अगदीं आरशासारखा करून ठेविला आहे. ज्ञानेश्वरीच्या मागून वामन पंडितांनीं आपली **यथार्थदीपिका** नामें गीतेवरील टीका पूर्वोक्त प्रकारेंच रचिली. तीही फार विस्तृत असून प्रसिद्ध आहे. तशीच वामन पंडितांची गीतेवर समश्लोकी टीकाही आहे. याशिवाय गीतेवरील तुकारामाचे अभंग, मुक्तेश्वराच्या ओंव्या, तुलसीदासाचे दोहरे व मोरोपंताच्या प्रा. आर्या, हीं सर्व प्रसिद्ध आहेत. **गीतार्थबोधिनी**मध्यें ज्या प्रासयुक्त आर्या छापिल्या आहेत, त्या कोणाच्या याविषयीं संशय आहे. त्यांत कोठें कर्त्यांचें नांव नसून, एकंदर त्यांच्या कवितापद्धतीचा विचार केला असतां, त्या आर्या मोरोपंताच्या असाव्या असें वाटत नाहीं. अलिकडील काळांत मराठींत गीतेवर ज्या कित्येक टीका झाल्या आहेत, त्यांत कैलासवासी वे. सं. रा. रा. रघुनाथ शास्त्री पर्वते यांची गद्यटीका फार विस्तृत असून अद्वैतसांप्रदायीक आहे. येथवर सांगितलेल्या संस्कृत व प्राकृत, प्राचीन व अर्वाचीन टीकांपैकीं बहुतेक छापल्या गेल्या आहेत.

याप्रमाणें ज्या गीतेवर अनेक विख्यात विद्वज्जनांनीं फार परिश्रम केले आहेत, व जी सर्वशास्त्रसारभूत मानिली आहे, तिची प्रस्तुतकाळीं आपल्या लोकांत जितकी व जशी प्रवृत्ति असावी व तशी नाहीं, ही गोष्ट फार खेदास्पद आहे. गीतापठन करण्याची चाल अंशतः अजूनही आहे; नित्य एक दोन अध्याय केवळ मुखपाठ

म्हणणारे किंवा वाचणारे वृद्ध लोकांत कांहीं कांहीं अद्याप आढळतात; व एकादा नित्य सर्व गीतापाठ करणाराही कचित् आढळतो. परंतु गीतेच्या अभ्यासानें आचार व विचार यांवर जो संस्कार व्हावा, तो झालेला फारसा पाहाण्यांत येत नाहीं. याचें मुख्य कारण, आपल्या लोकांत धर्मशिक्षणाचा प्रायः अगदीं लोप झाला आहे, हें होय. आतां अनेक कारणांमुळें आर्यविद्येचा साकल्येंकरून अभ्यास करणें जरी अशक्य झालें आहे, तरी अल्प कालांत व अल्प श्रमानें आर्यधर्माचीं मुख्य तत्त्वें व आचार शिकवून त्यांची प्रवृत्ति पाडण्याची तजवीज करणें हें आपलें सर्वांचें काम आहे. यास्तव जर एखादा आर्यधर्मसारभूत ग्रंथ उपलब्ध असेल, तर त्याचा अभ्यास सर्वांनीं करून, व आपल्या मुलांबाळांकडून करवून, तो अगदीं प्रचारांत येईल असें करावें. असा ग्रंथ माझ्या मतें सर्व शास्त्रीय-ग्रंथसमुदायांत **भगवद्गीता** हा आहे. जर हा ग्रंथ शास्त्रत्वेंकरून गृहीत होऊन याचें परिपूर्ण शिक्षण करण्याची प्रवृत्ति पडेल, तर धर्मविषयी, नीतीविषयीं, सदाचरणा-विषयीं आणि तत्त्वज्ञानाविषयीं आस्था आपल्या लोकांत विशेष उत्पन्न होऊन ते स्वकल्याणकारक मार्गाचें अनुसरण करतील, असें मला वाटतें. यास्तव, भग-वद्गीता आर्यधर्मसारभूत कशी आहे, याचा विचार करण्याकरितां हा निबंध लिहिला आहे.

भगवद्गीता हा ग्रंथ भारतांतीलच एक अंश असल्यामुळें याचा कर्ता व्यासमुनि, हें सर्वांस माहितच आहे. या ग्रंथाच्या रचनेचा काल अमुक आहे, असें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. तथापि हा ग्रंथ बहुत प्राचीन आहे असें कित्येक बाह्य व अंतर्गत कारणांवरूण लक्षांत येतें. कित्येक युरोपियन संस्कृतज्ञांचें असें म्हणणें आहे कीं, भगवद्गीता ही महाभारताचा मूळचा भाग नसून ती प्रक्षिप्त म्हणजे


# ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रिटेलर्स

मागून कोणीं लिहून त्यांत घातली आहे. या अनुमानास ते कितीएक प्रमाणें दाखवितात. परंतु त्यांतील एकही प्रमाण मला समर्पक दिसत नाहीं. एकं-दर महाभारताच्या आणि भगवद्गीतेच्या भाषेंत किंवा रचनेंत फारसा फरक दिसत नाहीं. व तींतील मुख्य मुख्य विषयही भीष्मपर्वांतच इतर स्थळीं, तसेंच शांतिपर्वादिक दुसऱ्या कित्येक पर्वांतहि निरनिराळ्या ठिकाणीं प्रसंगोपात्त आलेले आहेत. निष्काम-कर्म, अहेतुल भक्ति, आणि तत्त्वज्ञान, या तिहींचा समुच्चय हाच मुख्य धर्म, व हाच मोक्षप्राप्तीचा मार्ग, हें अनेक वैदिक ग्रंथांत, मन्वादिकांच्या स्मृतींत, आणि महा-भारतात अनेक स्थळीं सांगितलें आहे. आणि हाच भगवद्गीतेचा मुख्य प्रतिपाद्य विषय आहे. तसेंच भगवद्गीता हा भाग महाभारतांत अप्रासंगिक आहे, असेंही म्हणतां येत नाहीं. माझ्या ह्या दृष्टीनें तर भगवद्गीता ही भारतांत प्रसंगानुसारें व यथायोग्य स्थळींच आली आहे. दोहोंकडील सैन्यांत अनेक अत्यंत आप्त, इष्टमित्र जिवावर उदार होऊन युद्धास उभे राहिलें आहेत, हे मरण पावले असतां सर्व कुरु-कुळाचा व इतरही बहुतेक राजकुळांचा क्षय होणार आहे, असें पाहून अर्जुन दुःखानें अत्यंत विव्हळ झाला, हें साहजिकच आहे. कारण अत्यंत आप्तजनांत असें उग्र वैमनस्य पडून असा कुलक्षयकारक घोर संग्राम भारतीयुद्धापूर्वी कधींही झाल्याचें लिहिलेलें नाहीं. तेव्हां असा प्रसंग एकाएकीं पाहून अर्जुन शोकविव्हळ झाला, यांत कांहीं आश्चर्य नाहीं; व कृष्णानेंही त्याशीं समयोचित भाषण करून, यथार्थज्ञान व कर्तव्यकर्म यांचा बोध करून त्याचा तो शोक दूर केला, यांतही कांहीं आश्चर्य नाहीं. आतां कोणी असें म्हणेल कीं, युद्धाची तयारी होऊन दोहों बाजूंस दोन्ही सैन्यें शस्त्रें धारण करून युद्धास सिद्ध झाल्यानंतर तत्त्वज्ञानाविषयीं एवढा मोठा लांबलचक संवाद होण्यास अवसर कसा मिळाला असावा ? तर त्यावर माझें असें म्हणणें आहे कीं, प्राचीन काळीं आपल्या पूर्वजांचे युद्धांविषयीं कांहीं धर्मनियम असत; व त्यांस अनुसरून प्रायः युद्ध होत असे. त्यावरूनच प्राचीनकाळच्या युद्धसंग्रामास धर्मयुद्ध असें नांव पडलें आहे. त्या नियमांत, शत्रु युद्धास सावधपणें सिद्ध झाल्यावांचून त्यावर शस्त्र टाकावयाचें नाहीं, असा एक नियम होता. त्या नियमास अनुसरून अर्जुन शोकाकुल होऊन धनुष्यबाण खालीं ठेऊन स्वस्थ बसला आहे. असें पाहून दोहोंकडील सैन्यें तटस्थ राहिलीं; आणि कृष्णानें त्याचें समाधान करून तो पुनः पूर्ववृत्तीवर येई तोपर्यंत युद्धास आरंभ झाला नाहीं, हें धर्मयुद्धाच्या रीतीस अनुसरूनच आहे. दुसरें असें कीं, एखाद्या विषयावर तोंडीं संवाद होतो, तो थोडक्यांत होतोसा वाटतो; परंतु तो लिहिण्यांत लांबलचक दिसतो. या सर्व कारणांचा विचार केला असतां भगवद्गीता महाभारतांत अगदीं प्रासंगिक येते, हें कबूल केलें पाहिजे. आतां कवीनें ती मागून व्यवस्थितपणें गुळवून थोडी

लांबवून लिहिली असेल, इतकेंच. याप्रमाणें भगवद्गीतेची प्रसंगसंगति मुख्य ग्रंथाशीं कशी आहे ती सांगून आतां तींतील संभाषणाचा यथानुक्रम अनुवाद करितों.

भारतीय युद्ध चाललें असतां प्रज्ञाचक्षु धृतराष्ट्र यास युद्धाची सर्व हकीगत घरांतल्या घरांत प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणें कळावी म्हणून व्यासांनीं आपला शिष्य संजय यास त्याजपाशीं ठेवलें होतें. त्यास धृतराष्ट्रानें प्रथम हा प्रश्न केला.—

**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।**
**मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥**

अर्थ—हे संजया, परमपवित्र जें कुरुक्षेत्र तेथें युद्धेच्छु माझे आणि पांडूचे पुत्र एकत्र मिळून काय करिते झाले ?

या प्रश्नाचें उत्तर संजयानें धृतराष्ट्रास दिलें. त्यांत हा पुढें वर्णिलेला भगवद्गीता नामक कृष्णार्जुनसंवाद आला आहे. ह्या संवादाचे एकंदर अठरा अध्याय आहेत, हें पूर्वी सांगितलेंच आहे. वेदाचे जसे कर्मकांड, उपासनाकांड, आणि ज्ञानकांड असे तीन विभाग झाले आहेत, तसे गीता ही सर्व-शास्त्ररहस्यप्रतिपादक असल्यामुळें, तिचेही कर्मकांड, उपासनाकांड, आणि ज्ञानकांड, असे सहा सहा अध्यायांचा एकेक भाग याप्रमाणें तीन विभाग मानिले आहेत. पहिल्या सहा अध्यायांत कर्ममार्गाचें प्रतिपादन आहे; दुसऱ्या सहा अध्यायांत उपासना किंवा भक्तिमार्ग याचें प्रतिपादन आहे; आणि शेवटल्या सहा अध्ययांत ज्ञानमार्गाचें प्रतिपादन आहे. हे विषय या सहा सहा अध्यायांत प्राधान्येंकरून वर्णिले आहेत. परंतु पूर्वी सांगितल्याप्रमाणें, या तिन्ही मार्गांचा समुच्चय व्हावा हें ग्रंथाकर्त्यांस इष्ट असल्यामुळें, प्रत्येक षट्कांत म्हणजे सहा अध्यायांत, त्या षट्काच्या प्रधान विषयाखेरीज राहिलेल्या दोन विषयांचाही उल्लेख अवश्य येतो.

---

## साइभक्तांस अमूल्य संधी

साईलीला मासिकाचे सन १९५८ ( त्रैमासिक ) ते एप्रिल १९५९, ६०, ६१ व ६२ ( मासिक ) मार्चपर्यंतचें कांहीं अंक शिल्लक असून ते विक्रीस काढले आहेत, फुटकळ अंकास ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं ४ आणे. पोस्टेज निराळे. एक अंकासाठीं पोस्टेज ८ नये पैसे व चार अंकास २० नये पैसे पाठवावे.

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें ‘ लायसॉफ तेल ’ वापरा’
गिरगांव : बापट ब्रदर्स — दादर : वसंत फॉर्मसी




श्री. हरकचंद चंद्रभान या नांवाचे एक साईभक्त मु. आलेगांव पागा, ता. शिरुर, जि. पुणें हे लिहितात कीं, मी दर रामनवमीला बाबांच्या दर्शनासाठीं शिर्डीस जात असतों. परंतु यंदा त्याच सुमारास जमिनीसंबंधीं खटल्याची तारीख लागली होती. रामनवमी होती २ एप्रीलला आणि कोर्टाची तारीख ३ एप्रिल लागली होती; परंतु बाबानींच म्हटलें आहे कीं, ' माझा माणूस देशावर । असो का हजारों कोस दूर । आणीन जैसे चिडीचें पोर । बांधून दोरा पायांस ॥ तसेंच माझें झालें.

ती हकीगत माझ्या मोडक्या तोडक्या भाषेंत सांगत आहे. वरील कारणामुळें आपले येणें तारखेवर होणार नाहीं, म्हणून मी रामनवमीला जावयाचें रहित केलें. परंतु सोमवारीं सकाळीं ता. १।४।६३ रोंजी १० वाजतां आमचे येथून १ मैलावर असलेला राक्षेवाडी येथील ८ लोक सायकलनें शिर्डीस निघाले. व त्यांनी मला येण्याचा आग्रह करून निघावयास सांगितलें. त्याप्रमाणें मी त्यांच्याबरोबर १ तारखेस निघालों. वाटेंत घोडनदीपर्यंत सर्वजण बरोबर आलों. घोडनदीच्या पुढें गेल्यावर दोन सायकली पंपचर झाल्या. त्या काढण्यास वेळ झाल्यामुळें आम्हास नगर येथें पोहचण्यास संध्याकाळ झाली. व नगर शहरांतून बाहेर मुक्काम करण्याचा विचार होता. परंतु नगर शहरांत ४ सायकलवाले आमचे मागें आलें. व ४ सायकलवाल्यांची नगरांत चुकामूक झाली. त्या ४ लोकांना नगर शहरामध्यें रात्रीं पाहतां पाहतां ११ वाजले, तरी त्यांचा तपास लागला नाहीं. पहाटे उठल्यावर मी ह्या ४ लोकांस सांगितलें कीं, मजला येण्याचें जमणार नाहीं. कारण सायकलीवर जाऊन परत येणें होणार नाहीं. आणि मोटारमध्यें जागा मिळेल किंवा नाहीं याचें कांहीं सांगतां येत नाहीं.

त्यांनीं मला सांगितलें कीं नगर शहराबाहेर पडण्याचा रस्ता दाखवा व परत जा. त्याप्रमाणें मी त्या ४ लोकांना जकात नाक्यावर पुढें २ फर्लांग रस्ता दाखवून परत फिरलों. व सर्जेपुराच्या कोपऱ्यावर एक भय्याचें हॉटेल नुकतेंच उघडले होते. त्या हॉटेलच्या कडेला सायकल ठेवली. व त्यांच्याकडे दांत घांसण्यासाठीं मशेरी मागितली. तेव्हां त्या हॉटेल मालकानें सांगितले की, मशेरी नाहीं. तेव्हां मी म्हणालों थोडें मीठ द्या. त्याप्रमाणें त्यानें मीठ दिलें. व मी दांतास मीठ लाविलें.

इतक्यांत एक टुरिंग आली. त्या टुरिंगमध्यें एक साहेबी टोपीवाले गृहस्थ हॉर्न वाजवूं लागलें. तेव्हां मी त्या हॉटेलमधील नोकरांना सांगितलें कीं टुरिंगवाले

गृहस्थ हांका मारतात. तेव्हां तो नोकर त्या साहेबाजवळ गेला. तेव्हां त्या साहेबानें त्यास विचारले कीं शिर्डीचा रस्ता कोणता? तेव्हां तो नोकर म्हणाला, हाच रस्ता शिर्डीला जातो. त्यानंतर साहेबानें सांगितले कीं २ अंडीं व १ कप दूध आण, तेव्हां त्या नोकरांनी साहेबास सांगितले कीं अंडें मिळणारे हॉटेल पुढें आहे.

तेवढ्यांत मी साहेबाकडे गेलों. व त्यांना म्हणालों "साहेब मला शिर्डीला नेतां का?" तेव्हां साहेब म्हणाले "जा, जा मोठा आला!" एवढें रागानें म्हटल्यावर मी परत फिरून तोंड धुतलें. तेवढ्या वेळांत साहेब पुढच्या हॉटेलमध्यें खाणेंपिणें करून बाहेर निघाले. तोंपर्यंत मी पुन्हां जाऊन त्यांना विचारले कीं, साहेब आज रामनवमी आहे. व मला साईबाबांचें दर्शन झालें तर फार बरें होईल. यावेळीं तुम्ही मला शिर्डीला न्या हो!

तेव्हां साहेब म्हणाले, "आतां येतोस काय?" मी म्हणालों "होय" तर चल, तदनंतर मी म्हणालो "पिशवी घेवून येतो. नंतर त्या हॉटेलवाल्या भय्याला विनंती करून त्यांच्या दुकानांत सायकल ठेवली. व साहेबाच्या टुरिंगमध्यें बसलों. नंतर मोटार चालू झाली. नंतर ते मला म्हणाले, 'तुला लिहितां वाचता येतें का' मी म्हणालो 'हो, मी दररोज साईमहात्म्य वाचतों.' तेव्हां, साहेब म्हणाले 'वाच' मी साईमहात्म्य वाचण्याच्या अगोदर शनिमहात्म्य सुरू करून ७–८ ओळी वाचल्यावर मला आठवण झाली. तेव्हां मी साहेबास सांगितले कीं चूक झाली. तेव्हां ते म्हणाले पुन्हां वाच. त्याप्रमाणें मी शनिमहात्म्य वाचूं लागलों. थोडें कुठें चूक होऊं लागली कीं, त्या चुकीचें उत्तर साहेब अगदीं बरोबर सांगावयाचे. माझ्या मुखपाठ शनिमहात्म्य वाचतांना ४/५ चुका झाल्या परंतु त्या चुकांचे उत्तर साहेर बरोबर देत होते. म्हणून माझ्या मनाला वाटले कीं, माझ्यापेक्षां यांचे शनिमहात्म्य फार पाठांतर आहे.

शनिमहात्म्य संपेपर्यंत राहुरी, कोलार हीं गांवे गेलीं. व साहेब म्हणाले तुला आणखी काय येतें? तेव्हां मी म्हणालों, मला नकला येतांत. तेव्हां ते म्हणाले कीं नकला म्हणून दाखव. त्याप्रमाणें नकला म्हणून दाखविल्या. नंतर साहेब म्हणाले, आतां पुढें कोणतें गांव येणार? तेव्हां मी म्हणालो 'आता राहाते येणार आहे तेव्हां साहेब म्हणाले 'आपण तेथें चहा घेऊं.

नंतर राहाते हे गांव आल्यावर तेथें टुरिंग उभी केली. हॉटेलमध्यें जाऊन दोन स्पेशल चहा करण्यास सांगितले. तेव्हां साहेब म्हणाले, 'इंजीनमध्यें टाकण्याकरितां हॉटेलातून पाणी आण.' त्याप्रमाणें मी हॉटेलमधील जर्मनचे दोन ग्लास व लोटा भरून आणून इंजीनची टाकी भरली. नंतर चहा झाला. मी हॉटेलांत चहा घेतला व साहेबास गाडीकडे पाठविला. नंतर चहाचे पैसे मी देऊन पानाच्या दुकानासमोर उभा राहून साहेबास विचारलें कीं आपण पान खाता का? साहेब म्हणाले खातों. मी मसाल्याची दोन पाने घेऊन एक साहेबास दिलें व एक मी खाल्लें. नंतर गाडी सुरू झाली.

गाडी एक फर्लोंग गेली व साहेबानें विचारलें कीं, तूं आंघोळ केलीस का? मी म्हणालो नाहीं. तेव्हां साहेब म्हणाले, ' मग तूं काय करणार. मी म्हणालो साहेब शिर्डीला १० नया पैशाची बादली भाड्यानें घेऊन त्यांच्या हौदावर आंघोळ करणार. तेव्हां साहेब म्हणाले, 'आज रामनवमी आहे. तिथें फार गर्दी आहे. आपणास वाटेत पाणी मिळाले तर आपण आंघोळ करूं. त्याप्रमाणें मी त्यांना बरें असें सांगितलें. नंतर २ फर्लोंग शिर्डी राहिली होती. व वाटेत पाण्याचे इंजीन चालू होते. तेव्हां मी म्हणालो, साहेब गाडी उभी करा. येथें पाण्याचे इंजीन चालु आहे. त्याप्रमाणें साहेबानें गाडी वळवून झाडाच्या कडेला लावली व कपडे काढण्यास सुरुवात केली. तेव्हां मी म्हणालों, साहेब आपण कोण आहांत तें सांगा. तेव्हां ते म्हणाले, "तुला काय करावयाचें? तुला शिर्डीत आणलें ना. मग मी कुणी का असेना. ' नका सांगूं साहेब असें मी म्हणालो.

नंतर पुन्हां मी म्हणालों साहेब, आपण माझ्यावर नगरमध्यें रागावला होतां. तेव्हां साहेब म्हणाले, "अरे तूं जेव्हां मला परत विचारावयास आलास तेव्हां मला वाटलें कीं खरोखर तुला शिर्डीस जाण्याची इच्छा आहे, असें मला वाटलें. तेव्हां मी तुला चल असें म्हणालों. नंतर साहेब कपडे घेऊन निघाले तेव्हां साहेब मला म्हणाले, तूं आतां काय करणार? तेव्हां मी म्हणालों आपण सांगाल तें करणार. आम्ही दोघांनींही वाटेंत स्नान उरकलें नंतर गाडींत बसलों. शिर्डी जवळ येतांच तेथील कर घेणारे लोकांनीं गाडी उभी केली तेव्हां साहेबानें विचारलें कीं, गाडी उभी कां? तेव्हां मी म्हणालो येथे कर द्यावा लागतो. तेव्हां मी कराचे पैसे खिशांतून काढणार तोंच साहेब म्हणाले ".ये थांब तूं रहाता येथे पैसे भरलेस थांब, मीच देतों, असें म्हणून माझे व त्याचे मिळून कर पावतीचे ५० पैसे साहेबाला दिले व शिर्डीच्या ग्रामपंचायतच्या ऑफिससमोर गाडी उभी केली व म्हणाले तूं इथें थांब मी दर्शन घेऊन येतो. आम्ही शिर्डीस ८॥ वाजतां पोहोंचलों. नंतर साहेब दर्शनास गेले व एक तासानंतर साहेब दर्शन घेऊन आले व म्हणाले, अरे आपण रामजन्मानंतर जेवण करूं. व नंतर गाडी सुरू करून साहेब कोपरगांव मार्गानें गेले. मी पूजेचे ताट घेऊन श्रीसाईबाबांचे दर्शन घेऊन रामजन्म सोहळा पाहिला. नंतर धुळ्याहून येणाऱ्या एस. टी. मध्यें बसून ४ वाजतां नगर येथें पोहचलों व सायकलीवर बसून संध्याकाळीं ७ वाजतां कांबरगांवपासून २ मैलावर पिंपळगांव येथें आमचे चुलत्याच्या मेव्हण्याचे गांवीं मुक्काम केला. व ता. ३।४।६३ रोजीं सकाळीं पिंपळगांवहून निघून सायकलवर घोडनदी येथें ८॥ वाजतां पोहचलों व कचेरींत ११ वाजतां गेलों व अशा रीतीनें मला श्रीरामनवमीला श्रीसाईदर्शनाचा लाभ झाला.

माझे लेकरांना मी पायाला दोर बांधून आणीन अशा तऱ्हेचा अनुभव चालू रामनवमीला आढळून आला. साहेबानें आपलें नांव न सांगितल्यामुळें मला खेद वाटत आहे.

——०——

[आपल्या देशीं धर्मसाधन करावयाचें म्हणजे देहदंड केल्याशिवाय होत नाहीं, अशी एक समजूत आहे. उपासतापास करून देहाचे हाल करणें, एका पायावर उभें राहणें, खिळ्यांच्या टोंकांवर निजणें अशा अनेक साधनांनीं देहाचे हाल केले असतां पुण्यप्राप्ति होते, ह्या कल्पनेनें ह्या हिडिस मार्गांचें अवलंबून करणारे अनेक वैरागी आपण पाहातों. प्राचीन खिस्ती साधूंनाहि असाच समज होता. अशा साधूंपैकीं सेंट फ्रान्सिस ऑफ ॲसीसी हा एक होता. पण तो मृत्यशय्येवर पडला असतां शरीराची हेळसांड करणें हें वेडगळपणाचें आहे हें लक्षांत येऊन, उपासामुळें व देहदंडामुळें कृश झालेल्या हाताकडे पाहून मीं आपल्या गर्दभ भ्राल्याची (शरीराची) व्यर्थ हेळसांड केली असें त्यानेंहि स्पष्ट उद्गार काढले. तेव्हां आत्मविकास व्हावयाला देहाची योग्य काळजी घेणें अवश्य आहे हें सिद्ध होतें. आत्मविकास होण्याला मानसिक शक्तींची वाढ केली पाहिजे. मनुष्यप्राण्याला मन आहे म्हणूनच त्याला मनुष्य म्हणावयाचें. प्लेटोसारख्या तत्त्वज्ञानें मनुष्य म्हणजे पंख नसलेला पक्षी अशी त्या शब्दाची व्याख्या केली. त्याची टर उडविण्याच्या हेतूनें पंख काढलेला एक कोंबडा आणून तो लोकांना दाखवून सॉक्रेटीस म्हणाला, 'हा पहा प्लेटोचा मनुष्य!' कित्येक, मनुष्य म्हणजे हंसणारा प्राणी, बोलणारा प्राणी, पदार्थ शिजवून खाणारा प्राणी, अशा मनुष्य-शब्दाच्या व्याख्या करतात. परंतु हा शब्द मन म्हणजे विचार करणें ह्या संस्कृत शब्दावरून झालेला आहे व विचार करणारा प्राणी हीच त्याची योग्य व्याख्या आहे. म्हणून ही व्याख्या सार्थ करण्यासाठीं मनुष्यानें आपल्या मानसिक शक्ति वाढविल्या पाहिजेत.

## भाराभार ग्रंथ वाचन

मानसिक शक्तींची वाढ दोन प्रकारें करतां येते. उत्तमोत्तम ग्रंथवाचनानें व विचाराच्याद्वारें. ग्रंथवाचनासंबंधीं साधु रामदास ह्यांचा कटाक्ष सर्वश्रुत आहे. परंतु भाराभर ग्रंथ वाचले म्हणजे त्यानें कार्यभाग होत नाहीं. एकानें म्हटलें आहे कीं, अतिवाचनानें डोक्यावर पुस्तकांचा भार इतका पडतो कीं, त्या दडपणामुळें आंतील मेंदूला हालचाल करणें अशक्य होतें. समईत अती तेल घातल्यानें वात विझते तशी अती वाचनानें मनुष्याची स्थिति होते. दुसऱ्याची विचारसरणी आपली करीत रहाण्यापेक्षां आपण आपल्याच विचारशक्तींना चालना देणें केव्हांहि अधिक फायद्याचें आहे. रे॰ टिळकांच्या वनवासी फुलाचें काव्य वाचून किंवा वर्डस्वर्थच्या डॅफोडिल्सचें रम्य वर्णन पाहून त्यांतील रम्यता अनुभवण्याचा काल्पनिक प्रयत्न करण्यापेक्षां हीं फुलें स्वतः नजरेनें पाहून त्यांच्या निरीक्षणानें आपण स्फूर्ति प्राप्त करून घेणें हें जास्त श्रेयस्कर आहे. अभ्यासांत पाठांतराला महत्त्व कमी व विचाराला अधिक. हेंच मानसिक वाढीलाहि लागू आहे. तुकारामानें ग्रंथवाचन केलें नव्हतें, पण परमेश्वराविषयीं

विचार केला होता. म्हणूनच त्याचा प्रत्येक अभंग अनुभव सिद्ध असून अंतःकरणापासून निघालेला दिसतो. दैवी सत्याची वाढ आंतून बाहेर झाली पाहिजे. झऱ्याच्या पाण्याप्रमाणें तें अंतःकरणांतून बाहेर आलें पाहिजे व पावसाच्या पाण्याप्रमाणें बाहेरून आंत जातां कामा नये.

## विवेक व धर्मभावना

आत्मविकासाला ज्या अनेक गोष्टींची आवश्यकता आहे त्यापैकीं आणखी दोहोंचाच आपण विचार करूं, त्या म्हणजे विवेक व धर्मभावना. आपल्या ठिकाणीं असणाऱ्या पाशवी वृत्तीची वाढ होऊं नये व वेगवेगळ्या वासनांना ताब्यांत ठेवतां यावें ह्यासाठीं विवेक जागृति असली पाहिजे. हा अंतरींचा ज्ञानदिवा आपला खरा व बिनचूक मार्गदर्शक आहे, तो सतत जवळ असला पाहिजे. एवढेंच नव्हे तर तो प्रज्वलित राहिला पाहिजे, नाहींतर आमचें पतन व्हावयाला क्षणार्धहि लागावयाचा नाहीं. हा विवेक आम्हांला बरें-वाईट, खरें-खोटें, न्याय्य-अन्याय्य ह्यांतील फरक दाखवून योग्य तेंच आचरण्यास सांगतो, इतकेंच नव्हे तर हा नरदेह शाश्वत नाहीं व त्यामुळें आमची आध्यात्मिक वाढ जी ह्या ठिकाणीं देहनाशामुळें अपुरी राहते, ती परलोकीं पुरी होणें शक्य आहे हें दाखवून देतो व त्या दृष्टीनें जागिक जीवन आक्रमण्यास शिकवितो. पण विवेकापेक्षां श्रेष्ठ व विवेकजागृत करणारी प्रचंड शक्ति ह्या जगांत आहे व तीच ह्या जगाचें नियमन करीत आहे. ती शक्ति परमेश्वर होय. विवेक परमेश्वराचें स्थान घेऊं शकत नाहीं. मानवी जीवनसरिता परमेश्वररूपी महासागराला जाऊन मिळते. त्याच्याशीं आमचें सहकार्य झालें पाहिजे. तें धर्मभावनेच्या विकासानेंच होणें शक्य आहे. महासागराचें पाणी नदीच्या मुखांतून आंत येतें व त्यामुळेंच भरतीच्या ओघांबरोबर नदी व समुद्र ह्यांमधील दळणवळण कायम रहातें. नाहींतर नदीचें पाणी सांचून दूषित होईल. जीवात्मा व परमात्मा ह्यांचा असा मिलाफ होणें अवश्य आहे. एरव्हीं आमच्या आध्यात्मिक विकासाला अवकाश मिळणार नाहीं. परमेश्वराचा व आमचा संबंध जडेल तेव्हांच आमचें ऐहिक जीवन परिपूर्ण व यशस्वी होईल. हें कार्य आमच्या ठिकाणीं वास करीत असलेल्या धार्मिक भावनेच्या विकासानें होईल. म्हणून आत्मविकास व्हावा अशी इच्छा असणाऱ्यांनीं—अशी इच्छा हरएक मनुष्यमात्राची असावी—आपली शारीरिक, बौद्धिक, नैतिक व धार्मिक वाढ करण्याचा प्रयत्न करावा व तो करीत असतां शेवटच्या अंगावर अधिक लक्ष ठेवावें.

**सुखी संसारीं असावें। चित्त परब्रह्मीं ठेवावें** ॥ तुकाराम ॥

तुकारामबुवांच्या अनेक अभंगांमध्यें वरील तऱ्हेचा उपदेश मोठ्या आग्रहानें केलेला आपल्याला पुष्कळदां पहावयास सांपडतो. पण संसार व परमार्थसाधन ह्या दोन्ही स्थिति परस्परविरोधी मानलेल्या असल्यामुळें संसारांत सुखी असणें व परब्रह्मीं चित्त ठेवणें हीं दोन्हीं अवधानें साधावीं कशीं ? तीं कशीं साधावीं हें तुकारामबुवांनीं

नेहमींच्या प्रचारांतील व हिंदी कवींना अत्यंत प्रिय असणाऱ्या उपमा देऊन दाखवून दिलें आहे.

## जीवनावर आसक्ति नसावी

'पहा न्याय कमळिणीचा । सोस न करी जीवनाचा' ॥ ही एक उपमा. कमळाचें झाड पाण्यांत रहातें. पाणी शुद्ध असो, अशुद्ध असो, गढूळ असो किंवा शेवाळीनें युक्त असो, कसेंहि असलें तरी त्यामधून आपल्याला पोषक द्रव्यें शोषून घेतें व आपली वाढ करतें. त्याला सुंदर कमळें येतात व त्यामुळें तलावाला किंवा डबक्याला अनुपमेय शोभा येते; मनुष्यांच्या नाकाला व डोळ्याला सुख होतें व तीं मधमाश्या व भ्रमर ह्यांचें वस्तीस्थान होतात. कमळाचें झाड ह्या सर्व गोष्टी जीवनामुळें करूं शकतें पण त्या जीवनांवर त्याची आसक्ति नसते. तें जीवनांत असून जीवनाबाहेर असतें. तसेंच ताकांतून निघणारें लोणी ताकांतच रहातें पण ताकाशीं मिसळत नाहीं. ह्याप्रमाणें आपण संसारांत सुखी असावें पण त्यांतच दंग न होतां आपलें मन परमेश्वराच्या ठिकाणीं ठेवावें. संसार सुखप्राप्तीसाठीं करावयाचा असतो. मनुष्य समाजप्रिय प्राणी आहे. तो एकटा असला तर दुःखी होईल व त्यामुळें त्याचें मन आपल्याकडे लागणार नाहीं, म्हणून देव, 'पुत्र, वित्त, दारा, गृहादि सकळ' देऊन वाट पाहतो कीं, संसार करून मनुष्य सुखी होऊन आपल्याला ध्याईल. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, जो संसार सुखासाठीं करावयाचा तोच मनुष्याच्या दुःखाला कारण होतो. स्त्री-पुत्रांनीं नारायणाचें स्मरण करून देण्याऐवजीं तीं स्मरणाच्या आड येतात. संसार सुखसाधन व सुखसदन होण्याऐवजीं दुःखाचें कारण व दुःखसदन होतें. असें कां? तर संसारांत केव्हां अपरिमित सुख होतें तर केव्हां अत्यंत शोकाचे प्रसंग येतात; डोळ्यांतून दुःखाश्रूंचा प्रवाह वाहणें थांबत नाहीं; जीवाला कोठेंहि आश्रय नाहींसा होतो; व त्यामुळें संसार सुखाचा व्हावयाचा तीं जीवन, यौवन व धन क्षणभंगुर असल्याचा अनुभव येतो. संसारांत आज आपण पुत्राला प्रेमानें आलिंगन देतो काय व उद्यां त्यालाच स्मशानांत पोहोंचविण्याचा प्रसंग आपणांवर गुदरतो काय? आज आपण प्रेमानें गोड गोड भाषण करतो काय व उद्यां शोकाकुल होऊन रडतो काय!

तात्पर्य, संसार म्हणजे दुःखाचें घर आहे, त्यांत शांति प्राप्त व्हावयाची नाहीं. शांति पाहिजे तर आनंदधाम परमेश्वराकडेच गेलें पाहिजे. वास्तविकपणें संसार सुखदुःखानें भरलेला असल्यामुळें तो आपल्याला सुखदुःखसदन वाटावा. पण आम्ही सुख लवकर विसरतों व आपल्याला होणाऱ्या दुःखाच्या जखमांचे व्रण लवकर नाहींसे होत नाहींत व त्यामुळेंच संसार दुःखमय असतो. ह्यावर उपाय म्हणजे परमेश्वराचें सान्निध्य. कबीरानें सांगितल्याप्रमाणें परमेश्वर आपल्या अंतर्यामीं वास करतो. त्याला शोधण्याला

कसलेहि सायास नकोत, आपली दृष्टि हृदयाकडे लावली म्हणजे तेथें त्याचें आपल्याला दर्शन होईल. त्याला स्मरून संसार केला असतां, ' सुखी संसारीं असावें । चित्त परब्रह्मीं ठेवावें ' शक्य होणार आहे.

## आनंदी माणसाचा सहवास

आपल्यास द्रव्याचा लाभ होण्यापेक्षां आनंदी मनुष्याची गांठ पडणें अधिक फायद्याचें असतें. सुख दुःखाप्रमाणें सांसर्गिक असतें. आनंदी मनुष्य जेथें जेथें जातो, तेथें तेथें आपल्याबरोबर सुखाचें वातावरण नेत असता. तो आपल्याकडे आला तर जीवनदात्या सूर्यप्रकाशाप्रमाणें बरोबर उत्साहवर्धक आनंद आणीत असतो. हा आनंदी मनुष्य अगदीं गरीब असेल, तो कदाचित् डोकीवर टोपली घेऊन मजुरी करणारा हमाल असेल, किंवा रस्ते झाडणारा झाडूवालाहि असेल. त्याला वाङ्मय म्हणजे काय, गणित हा काय विषय आहे. भूमिति हें काय प्रकरण आहे ह्याची यत्किंचित्‌हि जाणीव नसल्यामुळें त्याला भूमितीचा सत्तेचाळीसावा सिद्धांत सोडवितां येणार नाहीं. पण तुम्हांआम्हां सुशिक्षितांना जो एक सिद्धांत सोडवितां येत नाहीं तो, तो आपल्या प्रत्यक्ष वर्तनानें सोडवीत असतो. तो सिद्धांत म्हणजे मानवी जीवनसंसार सुखमय आहे हा होय.

आमचा संसार सुखाचा व्हावा म्हणून परमेश्वरानें नैसर्गिक, मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक अशा असंख्य योजना केल्या आहेत. त्या सर्वांचा आज विचार करणें अशक्य आहे. आज केवळ नैसर्गिक योजनांचा आपण थोडासा विचार करूं.

## जगांत सर्वत्र आनंद आहे

परमेश्वरानें आपणांला ज्या पृथ्वीवर जन्मास घातलें आहे त्या पृथ्वीच्या दाही दिशांकडे पाहिलें असतां सर्वत्र आनंद, सुख, उल्हास व उत्साह हीं ओतप्रोत भरलेली दिसतात. आपल्या डोकीवरील निळें आकाश, त्यांतून वाऱ्याबरोबर वाहात असलेले नाना रंगाचे व नाना आकारांचे लहान–मोठे ढग, त्यामुळें आपणांला मिळणारें पाणी आकाशांतून दिवसा प्रवास करणारा जीवनदाता सूर्य व रात्रीच्या वेळीं आपल्या शीतल किरणांनीं आपणाला सुख देणारा चंद्र, आकाशांत चमकत असणारे असंख्य तारे, जे परमेश्वराचें अनुपमेय वैभव दाखवून देतात व जे आपल्या प्रकाशानें त्याची कीर्ति दिगंतरीं पोहोंचवितात, हा देखावा पाहून आपलें अंतःकरण उचंबळत नाहीं काय? पृथ्वीवर आपल्या सभोंवार नजर टाकली तर काय योजना दिसतें बरें! जिकडे पहावें तिकडे नद्या, नाले, डोंगर, दऱ्या, कुरणें, पर्वत ह्यांचेच सौंदर्य आपणांस दिसत नाहीं काय? पर्वतामागें पर्वतांच्या अनेक रांगा, त्यांच्यावरची वनश्री, त्यांच्या माथ्यावरील हिमाचें शुभ्र आच्छादन, त्यावर सकाळ-संध्याकाळ पडणारा सूर्यप्रकाश व त्यामुळें दिसणारीं असंख्य इंद्रधनुष्यहि पाहून आपलें अंतःकरण मोहून जात नाहीं काय? अज्ञात असणारीं

पृथ्वीच्या पोटांतील असंख्य रत्नें, ज्यांच्याशिवाय मानवी जीवन सुखकर होणार नाहीं, अशा धातु व खनिज द्रव्यें, हीं सर्व आमचा संसार सुखाचा व्हावा म्हणूनच ना परमेशानें उत्पन्न केलीं ? डोंगरांवरून नागमोडीनें वाहणारे असंख्य सर्पाकृति पाण्याचे प्रवाह, आपल्या कांठावरील प्रदेश सुपीक करीत वाहणाऱ्या नद्या, त्यांचें समुद्राशीं होणारें मीलन, त्यामुळें जीवात्म्याच्या व परमात्म्याच्या भेटीची होणारी प्रचीति; तो प्रचंड महासागर, त्यांत प्रतिबिंबित होणारें नील आकाशाचें हृदयस्पर्शी दर्शन, महासागरांत आनंदानें खेळत–बागडत असलेलें असंख्य मत्स्य व इतर प्राणी हें सर्व पाहून कोणा सहृदय मनुष्याचें अंतःकरण आनंदानें भरून जाणार नाहीं ? आणि सर्व निसर्गाचा राजा जो मनुष्य, त्याचें सरळ चालणें, समोर पहाणें, त्याची बुद्धि, त्याचें ज्ञान, त्याचें कर्तृत्व, त्याचें आध्यात्मिक सामर्थ्य, त्याची नारायण होण्याची पात्रता हें सर्व पाहून ह्या सर्वांचा स्रष्टा जो परमेश्वर त्याला धन्यवाद देण्याची आपणांला स्फूर्ति होणार नाहीं काय ?

## संसार सुखाचा कसा होईल ?

इतकीं सुखाचीं साधनें परमेश्वरानें आम्हांला उपलब्ध करून दिलेलीं असतां संसार म्हणजे दुःखसदन म्हणण्याचा किंवा मानण्याचा अधिकार आम्हांला कसा पोहोंचतो ! असें म्हणणें म्हणजे कृतघ्नपणा होय. वर्ड्स्वर्थसारख्या कवीचें अंतःकरण आकाशांतील इंद्रधनुष्य पाहून उचंबळून येई. अशी आमचीहि वृत्ति झाली पाहिजे. आमचा दृष्टीकोन असाच बनला पाहिजे कीं त्यामुळें आनंद, सुख, समाधान ह्यांकडे अधिक लक्ष जाऊन दुःखाकडे दुर्लक्ष होईल; निदान त्यांची तीव्रता तरी फार वेळ भासणार नाहीं. रॉबर्ट लुई स्टिव्हेन्सन ह्या भगवद्भक्ताचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून आम्हीं आमचा संसार केला तर तो सुखाचाच होईल व आमचे चित्तहि परब्रह्मीं राहील. स्टिव्हेन्सन सतत चौदा वर्षें एका असाध्य रोगानें बिछान्याला खिळलेला होता. परंतु असह्य वेदना होत असतां, रक्तस्राव चालू असतां, अशक्ततेमुळें डोळ्यांपुढें अंधारी येत असतांहि त्यानें आपलें लेखनकार्य सोडलें नाही, परमेश्वराला दोष दिला नाहीं; आपल्या दुःखमय जीवनासंबंधी किंचितहि कुरकुर केली नाहीं. शेवटपर्यंत त्यानें आपली आनंदी व समानवृत्ती कायम ठेवली. त्यामुळें त्याचा संसार सुखाचा होऊन चित्त ईश्वराच्या ठिकाणीं राहिलें. अशी समाधानवृत्ति ठेवून संसारांत राहणें आम्हां सर्वांना शक्य आहे व संसार सुखाचा होण्याला ह्या वृत्तीची अत्यंत आवश्यकता आहे.



# संतांचे अनुभव हेंच शास्त्र

## आसुरी संपदेपासून सुटका

दैवी संपत्तीचा विकास करावयाचा व आसुरी संपत्तिपासून दूर रहावयाचें. दूर राहण्यासाठीं या आसुरीचें वर्णन भगवान् करून राहिले आहेत. या आसुरी वर्णनांत तीनच मुख्य गोष्टी आहेत. असुराच्या चरित्राचें सार 'सत्ता, संस्कृति व संपत्ति' या तीन वस्तूंत आहे. आपलीच संस्कृति काय ती उत्कृष्ट व तीच साऱ्या जगावर लादली जावी, ही महत्त्वाकांक्षा. आपलीच संस्कृति कां लादली जावी ? तर ती म्हणे चांगली आहे. ती चांगली कां ? तर ती आपली आहे म्हणून. आसुरी व्यक्ति काय किंवा अशा व्यक्तींनीं बनलेलीं साम्राज्यें काय, त्यांना या तीन गोष्टी पाहिजे असतात.

### आसुरी विचारसरणी

ब्राह्मणांना वाटतें ना कीं आपली संस्कृति सर्वश्रेष्ठ, सारें ज्ञान आपल्या वेदांत आहे. वैदिक संस्कृतीचा विजय सर्व जगभर व्हावा. अग्रतश्चतुरो वेदान् पृष्ठतः सशरंधनु असें होऊन सर्व पृथ्वीवर आपल्या संस्कृतीचे झेंडे नाचवावेत. परंतु पाठीमागें 'सशरंधनु' असलें कीं पुढच्या बिचाऱ्या वेदांचा निकालच लागतो. मुसलमानांस असेंच वाटतें कीं कांहीं आहे तेवढेंच खरें. खिस्ताच्या अनुयायांना तसेंच वाटतें इतर धर्मांतील मनुष्य कितीहि वर गेलेला असो, त्याचा जर खिस्तावर विश्वास नसेल तर त्याला स्वर्ग मिळणार नाहीं ! देवाच्या घराला त्यांनीं एकच दरवाजा ठेवला आहे व तो म्हणजे खिस्ताचा ! लोक आपल्या घरांना तर खूप दरवाजे व खिडक्या लावतात. परंतु बिचाऱ्या देवाच्या घराला एकच दरवाजा राखतात. 'कुलीन मीचि संपन्न माझी जोडी कुठें असे' असें सर्वांना वाटत असतें. मी म्हणें भारद्वाज कुळांतला ! ती परंपरा माझी अव्याहत चालली आहे. पाश्चात्यांतहि असेंच आहे. आमच्या नसांत म्हणे नॉर्मन सरदारांचें रक्त आहे ! आपल्याकडे गुरुपरंपरा असते ना. मूळ आदिगुरु म्हणजे शंकर, मग ब्रह्मदेव किंवा कोणीतरी गांठावयाचा. मग नारद, मग व्यास, मग आणखी एखादा ऋषि. मग आणखी मध्यें दहापांच लोक घालून मग स्वतःचा गुरु, मग मी—अशी परंपरा दाखवावयाची. आपण मोठे, आपली संस्कृति श्रेष्ठ, असें वंशावळीवरून सिद्ध करावयाचें. अरे, तुझी संस्कृति उत्तम असेल तर तुझ्या कृतींतून ती दिसू दे. तिची प्रभा

आचरणातून फांकू दे. परंतु तें नाहीं. जी संस्कृति स्वतःच्या जीवनांत नाहीं, स्वतःच्या घरांत नाहीं. ती जगभर फैलावूं पाहणें या विचारसरणीला आसुरी म्हणतात.

## संपत्ति कशासाठीं ?

ज्याप्रमाणें माझी संस्कृति सुंदर, त्याप्रमाणें जगांतील सारी संपत्ति घ्यावयास लायक मीच. सारी संपत्ति मला पाहिजे व मी ती मिळविणारच. ती संपत्ति कां मिळवावयाची ? तर बरोबर समान वांटणी करण्यासाठीं ! यासाठीं स्वतःस संपत्तींत पुरून घ्यावयाचें ! तो अकबर म्हणत असे ना, "अजून रजपूत माझ्या साम्राज्यांत कां दाखल होत नाहींत ? एक साम्राज्य होईल, शांति नांदेल !" अकबरास असें प्रामाणिकपणें वाटत होतें. हल्लींच्या असुरांस असेंच वाटतें कीं संपत्ति सारी एकत्र करावयाची. कां ? तर ती पुन्हां वांटण्यासाठीं.

त्यासाठीं मला सत्ता हवी. सारी सत्ता एका हातीं केन्द्रीभूत झाली पाहिजे. ही तमाम दुनिया माझ्या तंत्राखालीं राहिली पाहिजे. स्वतंत्रता माझ्या तंत्राप्रमाणें चालली पाहिजे. माझ्या ताब्यांत जें असेल, माझ्या तंत्राप्रमाणें जें चालेल, तेंच स्वतंत्र. अशा प्रकारें संस्कृति, सत्ता व संपत्ति या मुख्य तीन गोष्टींवर भर आसुरी संपत्तींत दिला जातो.

एक काळ असा होता कीं ब्राह्मणांचें वर्चस्व समाजावर असे. त्यांनीं शास्त्रें लिहावीं, कायदे करावे, राजांनीं त्यांना नमावें. तें युग पुढें ओसरलें. क्षत्रियांचें युग आलें. घोडे सोडावयाचें, दिग्विजय करावयाचे. क्षत्रियसंस्कृतिहि आली व गेली. ब्राह्मण म्हणे, "मी शिकविणारा, बाकी शिकणारे, माझ्याशिवाय गुरु कोण ?" ब्राह्मणांना संस्कृतीचा अभिमान होता. क्षत्रियांचा भर सत्तेवर होता. "याला आज मी मारलें, त्याला उद्यां मारीन" या गोष्टीवर यांचा सारा जोर. पुढें वैश्यांचें युग आलें. "पाठीवर मारा परंतु पोटावर मारूं नका" यांत वैश्यांचें सारें तत्त्वज्ञान आहे. सारें पोटाचें शहाणपण शिकवावयचें, "हें धन माझें आहे, आणि तेंहि माझें होईल" हाच जप आणि हाच संकल्प. इंग्रज आपणांस म्हणतात ना, "स्वराज्य पाहिजे तर घ्या. फक्त आमचा पक्का माल येथें खपण्याच्या सवलती ठेवा म्हणजे झालें. मग तुमच्या संस्कृतीचा तुम्ही खूप अभ्यास करा. लंगोटी लावा व संस्कृति सांभाळा." आजकाल होणारीं युद्धें हीं व्यापारी असतात हेंहि युग जाईल, जाण्यास आरंभहि झाला आहे. असे हें सारे आसुरी संपत्तीचे प्रकार आहेत.

## काम, क्रोध आणि लोभ

आसुरी संपत्ति दूर सारण्याचा प्रयत्न करावा. आसुरी संपत्ति म्हणजे थोडक्यांत "काम, क्रोध व लोभ." सर्व जगाला हें काम–क्रोध–लोभ नाचवीत आहेत. हा नाच आहे तो आतां पुरे. हे सोडलेच पाहिजेत. क्रोध व लोभ कामांतून

उत्पन्न होतात. कामाला अनुकूल परिस्थिति प्राप्त झाली म्हणजे लोभ उत्पन्न होतो व प्रतिकूल परिस्थिति असली म्हणजे क्रोध उत्पन्न होतो. गीतेंत पदोपदीं या तिघांपासून दूर रहा असें सांगितलें आहे. सोळाव्या अध्यायाच्या शेवटीं हेंच सांगितलें. काम–क्रोध–लोभ हें नरकाचे तीन भव्य दरवाजे आहेत. या दरवाजांतून पुष्कळ रहदारी आहे. अनेक लोक जातात येतात. नरकाचा रस्ता ऐसपैस रुंद आहे. तेथून मोटारी जातात. वाटेंत पुष्कळ सोबतीहि भेटतात. परंतु सत्याचा रस्ता अरुंद आहे.

## बचाव कसा करावयाचा?

अशा या काम-क्रोधापासून बचाव कसा करावयाचा ? संयमाचा मार्ग स्वीकारून. शास्त्रीय संयमाची कास धरली पाहिजे. संतांचे अनुभव म्हणजेच शास्त्र. प्रयोग करून संतांना जे सिद्धान्त लाभले त्याचें शास्त्र होतें. या संयमाच्या सिद्धांताची कास धरा. उगीच शंका काढीत नका बसूं. काम-क्रोध जगांतुन गेले तर जगाचें कसें होईल, जग तर चाललेंच पाहिजे, थोड्या प्रमाणांत तरी काम-क्रोध राखावयास नकोत का, असल्या शंका कृपा करून काढूं नका. काम-क्रोध भरपूर आहेत, तुम्हांला जरूर आहे त्याहून ज्यास्त आहेत. उगीच बुद्धिभेद कां निर्माण करतां ? काम–क्रोध–लोभ तुमच्या इच्छेहून कांकणभर जास्तच आहेत. काम मेला तर संतति कशी निर्माण होणार, अशी नको चिंता. वाटेल तेवढी संतति तुम्हीं निर्माण केलीत तरी एक दिवस असा उजाडणार आहे कीं, मनुष्याचें नांव पृथ्वीवरून साफ पुसून जाईल. शास्त्रज्ञ ही गोष्ट सांगत आहेत पृथ्वी हळूहळू थंड होत आहे. एके काळीं पृथ्वी अत्यंत उष्ण होती तेव्हां तिच्यावर जीव नव्हता. एक काळ असा येईल कीं पृथ्वी अत्यंत थंड होईल व जीवसृष्टी सारी लयाला जाईल या गोष्टीला लाखों वर्षे लागतील. तुम्ही संतति कितीहि वाढवा परंतु शेवटीं हा प्रलय व्हावयाचा आहे हें निश्चित. परमेश्वर जो अवतार घेतो तो धर्म–रक्षणार्थ घेतो, संख्या–रक्षणार्थ नव्हे. धर्मपरायण असा एक तरी मनुष्य जोंपर्यंत आहे, जोंपर्यंत एक तरी पापभीरु व सत्यनिष्ठ मनुष्य आहे, तोंपर्यंत काळजी नाहीं. ईश्वराची त्याच्याकडे नजर राहील. ज्यांचा धर्म मेलेला आहे असे हजारों लोक असून–नसून सारखेच.

हें सारें लक्षांत घेऊन सृष्टींत बेतानें रहा, संयमपूर्वक वागा. बेताल वागूं नका. लोक–संग्रह करणें याचा अर्थ लोक म्हणतील तसें वागणें नव्हे. माणसांचे संघ वाढविणें, संपत्तीचे ढीग जमा करणें, म्हणजे सुधारणा नव्हे. संख्येवर विकास अवलंबून नाहीं. समाज जर बेसुमार वाढेल तर माणसें एकमेकांचे खून करतील. प्रथम पशुपक्ष्यांना खाऊन मनुष्यसमाज माजेल. मग स्वतःच्या पोराबाळांना तोडून खावें लागेल. काम–क्रोधांत सार आहे, हें म्हणणें जर स्वीकारलें तर शेवटीं मनुष्य मनुष्याला फाडफाडून खाईल यांत तिळमात्र शंका नको. लोक–संग्रह म्हणजे सुंदर व विशुद्ध नीतीचा मार्ग लोकास दाखविणें. काम–क्रोधांतून

मुक्त झाल्यामुळें पृथ्वीवरचा मनुष्य जर नाहींसा झाला तर मंगळावर उत्पन्न होईल. म्हणून ती चिंता नको. अव्यक्त परमात्मा सर्वत्र भरून राहिला आहे. तो तुमची काळजी घेईल. प्रथम तूं मुक्त हो. पुढचें फार नको पाहूं. सृष्टि व मानवजात यांचीं नको काळजी. तुझी नैतिक शक्ति वाढव. काम-क्रोध झड झडून टाक. 'आपुला तूं गळा घेई उगवूनि.' तुझी मान सांपडली आहे ती आधीं वांचव. इतकें केलेंस तरी पुष्कळ झालें.

संसार समुद्रापासून दूर काठावर उभे राहून समुद्राची गंमत पाहण्यांत आनंद आहे. जो समुद्रात गटांगळ्या खात आहे, ज्याच्या नाकातोंडांत पाणी जात आहे, त्याला समुद्राचा काय आनंद ? संत समुद्रतीरावर उभे राहून आनंद लुटतात. संसारापासून अलिप्त राहण्याची ही जी संतांची वृत्ति, ती अंगीं मुरल्याशिवाय आनंद नाहीं. कमल-पत्राप्रमाणें अलिप्त रहा. बुद्धानें म्हटलें आहे, 'संत उंच पर्वताच्या शिखरावर उभे असतात व तेथून ते खालीं संसाराकडे पाहतात. मग हा संसार त्यांना क्षुद्र दिसतो.' तुम्हीहि वर चढून पहा, म्हणजे हा अफाट पसारा क्षुद्र दिसेल. संसारांत मग लक्षच लागणार नाहीं.

सारांश, भगवंतांनीं आसुरी संपत्ति दूर करून दैवी संपत्ति जवळ करावी असें कळकळीनें सांगितलें आहे. त्याप्रमाणें यत्न करावा.

—संत विनोबा



* उत्कृष्ट कागद * आकर्षक रचना
* स्वच्छ व सुबक छपाई
**बॉम्बे सेंट्रल प्रेस**
मुरलीधर टेंपल कंपाऊंड, ठाकुरद्वार पोस्टाशेजारीं
जगन्नाथ शंकरशेट रोड, ठाकुरद्वार मुंबई २

# तुझे चरण लाभूं दे

## एका आर्ताची प्रार्थना

ब्रह्मांड गोलांत अनंत ग्रहमाला, ज्यांच्या भव्यपणाची दिव्यत्वाची कल्पनाही करणें टिचभर मानवाच्या वितभर मेंदूस आवाक्यांबाहेरचें आहे असें जग निर्माण करून त्यांचा फेर चौफेर फिरवीत बसण्याचा खेळ खेळणाऱ्या प्रचंड शक्तिमान्, ज्ञानमय, दिव्य ब्रह्मांड नायक ! तुला कोणत्या चिमुकल्या हस्तद्वयानें प्रणाम करूं ? तुला तो दिसेल काय ? हे विश्वव्यापका ! कोठें तुझें विस्तीर्णपण आणि कोठें मी बिंदूचाही लक्षांश. पण प्रभो ! ज्या अर्थी मुंगीपेक्षांही सहस्त्र पटीनें सूक्ष्म जीव निर्माण करून त्यांची जिवित यात्रा ही ते सुखें चालवीत आहेस, त्या अर्थी माझी ही कृतज्ञतेची विनम्र प्रणती तुझ्या सूक्ष्म दृष्टींतून निसटणार नाहीं अशी मला खात्री आहे. मानवसृष्टींत जनरंजनासाठीं नानातऱ्हेचे प्राणी, हिंस्त्र श्वापदें, वनचर पैदा करून त्यांना शिकवून त्यांचा खेळ करणारा सर्कसचा एक सूत्रधार जसा तंबूसह सर्व पसारा वागवीत गावोगांव हिंडत असतो, तसा भगवंत ! या पृथ्वीवर नानातऱ्हेचे प्राणी, वनस्पती, पशु, पक्षी, फुलें, फळें, सागरांतील चमत्कृतीजन्य जीवसृष्टी कीं ज्याचा अंतहि मानवास लागला नाहीं. ही सृष्टि निर्माण करून त्यांचा प्रतिपाळ करून व यथाकाळ त्यांना लय करून हें विश्वाचें जीवनाचें रहाटगाडगें स्थलकालाची तमा न करतां चालवीत असलेला पाहून मी स्तिमित होतों व तुझें हें अफाट, सौंदर्यानें ओथंबलेले तसेंच भीषण, रौद्र ऐश्वर्य पाहून क्षणभर आनंदीत तर क्षणभर दुःखानें व्याकूळ होतों.

काय हेतूनें हा सुखदुःखाचा पिंगा तूं घालीत आहेस ? कशाला इतकीं मोहक सुखें निर्माण केलींस व त्यांच्यातूनच दुःखें प्रसवतोस ? जीव जन्माला घालण्याची केवढी चतुर, दक्ष, योजना पण जन्माला आलेल्या जीवाला किती अनंत यातना तूं निर्माण केल्या आहेस. काय यांत तुला सुख वाटतें कीं जें पाहून माझें हृदय फाटतें, व्यथित होतें व नको हा जीव, नको या पृथ्वीवर जन्म, असें मला वाटावें. कशासाठीं मला जन्माला घातलेंस ? कशासाठीं ही विचित्र सृष्टी मला दाखविलीस ? कशासाठीं हें आकलन होण्याइतकी बुद्धी दिलीस ? यापेक्षां अज्ञान किती गोड ! लांबून कल्पनेनें चंद्रबिंबाचा सुखविलास काय वाईट होता कीं, इतक्या दूर त्या वातावरण विरहित अर्ध तप्त अर्धशीत गोळ्यावर मानवास जाण्याची व काय आहे तें पाहण्याची आतुरता व्हावी ? कशाला एवढें ग्रहमालेचें ज्ञान दिलेंस की, ही विस्तीर्ण पृथ्वी लहान वाटून मानवाने ग्रह मालेच्या शोधांत गुंग व्हावें ?

टीक आहे. पुरुषार्थाला हें आव्हान आहे. पण याचे पोटीं अनंत दुःखांची माळ लावणार नाहींस ना ? निसर्गाचें आव्हान मानवानें स्वीकारून आपलें जीवन पुष्कळच

सुखी केलें यांत शंका नाहीं. पण त्यांतच त्याच्या कमकुवतीचें बीज फोंफावत आहे. सुखासीन मानव दुर्बळ होत आहे. परावलंबी होत आहे. निदान भगवंता ! तुझें निर्मितीचें चक्र तरी थोडें सौम्य कर कारण त्यांतच विनाशाची बिजें लपलेलीं आहेत. आणि विनाश अटळ आहे तर तो सौम्य तरी कर. इथला खेळ झाल्यावर तुझ्याकडे परत येतानां कष्ट देऊं नकोस तर मार्गदर्शन कर खेळ चालू ठेवण्यासाठी निर्माण केलेली नजरबंदी काढून घे. आणि सत्य स्वरूप दाखव कीं जें पाहून आम्ही तुझेच अंश तुझ्याकडे लोहचुंबकांकडे लोह धांवते तसे येऊं. इथली गंमत कळली तींत आतां स्वारस्य राहिले नाहीं. ज्यांनीं आम्हांस जन्म दिला, पालन-पोषण केलें, आमचे कष्ट काढले व जे आतां तुझ्या चरणाजवळ विसावा घेत असतील. त्यांच्या गांठी-भेटीसाठीं जीव आतुर झालेला आहे. तेव्हां एकच प्रार्थना आहे कीं 'जीवन विना दैन्ये व्यतीत केलेंस हे अनंत उपकार आहेत. असेंच अनायासेन 'मरण' म्हणजेच तुझे चरण मिळूं दे.

---

## पोंच व अभिप्राय —

नामदेव सेवक-संपादक, श्री. द. मो. पाटसकर, पुणें ४. नामदेवादि अठरा तत्सम ज्ञातींच्या सर्वांगीण हितास्तव झटणाऱ्या, नामदेव समाज परिषदेचें अधिवेशन दि. २७-२८ एप्रिलला कोल्हापूर येथें झालें. त्या निमित्त, याच ध्येयधोरणानुसार संत श्रीनामदेवांच्या शिकवणुकीप्रमाणें चालणाऱ्या या मासिकाचा, दि. १५ एप्रिलला नेहमींचा अंक प्रसिद्ध झाल्यानंतर, खास परिषद जादा अंक प्रसिद्ध झाला. त्यानंतर दि. १५ मेचा नेहमींचा अंक प्रसिद्ध झाला. नेहमींच्या व नवीन वर्गणीदारांस, वार्षिक वर्गणी रु. २-५० व किरकोळ अंक ३१ न. पैशांत देण्यांत आले. परिषदेचे अध्यक्ष श्री. ज. ग. बोधे, यांचें भाषण सर्व ज्ञातिसंस्थांचें उद्बोधन करणारें असल्यामुळें जादा अंकांत समग्र प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. पानशेत पुरांत सर्वस्वी बुडाल्यानंतर, मासिकाचे आद्य संचालक श्री. मो. ना. पाटसकर यांचें अल्पावधींतच देहावसान झालें. त्यानंतरहि अडीच हजार रुपयांची स्वतः झीज सोसून त्यांच्या चिरंजीवानीं केवळ ज्ञातिहितास्त हें मासिक नियमित चालू ठेविलें आहे; हें अशा प्रकारें सर्वत्र विविध ज्ञातिकार्य करणाऱ्या सर्व व्यक्तींस व संस्थांस हा आदर्श भूषणावह आहे. ज्यांच्यासाठीं तें प्रसिद्ध करण्यांत येत आहे, त्यांनी हें मासिक स्वावलंबी करण्यासाठीं सर्वप्रथम झटणें उचित होय.



## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| (१) श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) **Glimpes of Indian Spirituality** | | - by Pradhan | १-०० |
| (७) **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (११) साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) **Spiritual Symphony** | | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| (२१) **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००-७५ |
| (२२) **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (२३) स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | |
|---|---|
| (1) Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.



मालक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, मुंबई १४.

June 1963 Regd. No. B 7985



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांची तीन रंगी चित्रे, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणी मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : शा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी. दादर, मुंबई १४